मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | गुरुवार, २४ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२४ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## सिकंदरने मोडला रोहितचा वर्ल्ड रेकॉर्ड

**नैरोबी :** झिम्बाब्वेने आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-20 क्रिकेटच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वोच्च 4 बाद 344 अशी धावसंख्या उभी केली आहे. यापूर्वी 2023 मध्ये नेपाळने आशियाई क्रीडा स्पर्धेत हांगझोऊ येथे मंगोलियाविरुद्ध 3 बाद 314 धावा केल्या होत्या आणि त्या पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-20तील सर्वोत्तम धावसंख्या होत्या. प्रथमच ट्वेंटी-20 क्रिकेटमध्ये एखाद्या संघाने 300 पार धावा केल्या होत्या आणि आज हे दोन्ही विक्रम झिम्बाब्वेने मोडले. झिम्बाब्वेने आक्रमक फटकेबाजी करताना गांबियाविरुद्ध 4 बाद 344 धावांचा डोंगर उभा केला. त्यांचा कर्णधार सिकंदर रझाने ऐतिहासिक शतक झळकावले. त्याने अवघ्या 33 चेंडूंत शतकी खेळी करताना रोहित शर्मा व डेव्हिड मिलरचा विक्रम मोडला.



**ही माझी नवी सुरुवात!**

पान 8

# मविआचं अखेर ठरलं! सर्वांनाच सम-समान जागा 85-85-85



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर करून आता आठवडा लोटेल. उमेदवार अर्ज प्रक्रियाही सुरू झालेली आहे. परंतु, महाविकास आघाडीचे जागा वाटप काही होत नव्हते. गेल्या काही दिवसांपसून तिन्ही प्रमुख पक्षांतील वरिष्ठ नेत्यांच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, या चर्चांना पूर्णविराम मिळत नव्हता. त्यातच शिवेसना आणि काँग्रेस यांच्यातील मुंबई आणि विदर्भातील काही जागांवर वाद असल्याचं समोर आलं. त्यामुळे जागा वाटप रखडले असल्याचंही सांगण्यात आलं. परंतु, आता जागावाटप झालं असून महाविकास आघाडीने जागावाटपाचा फॉर्म्युला आज पत्रकार परिषद घेऊन सांगितला.

महाविकास आघाडीतील नाना पटोले, संजय राऊत यांनी आज मुंबईत शरद पवारांची भेट घेतली. या भेटीत जागा वाटपाबाबत शेवटची चर्चा झाल्याची माहिती संजय राऊतांनी आज पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला प्रत्येकी 85 जागा देण्यात आल्या आहेत. म्हणजेच, 270 जागांचं जागावाटप झालेलं आहे. 288 पैकी 270 जागांची यादीही तयार झाली असल्याची माहिती संजय राऊतांनी दिली. तसंच, उर्वरित जागा इतर मित्रपक्षांना देण्यात येणार आहेत. त्यासंदर्भात उद्या सकाळपासून चर्चा सुरू होईल, असं संजय राऊत म्हणाले.

काँग्रेस आणि शिवसेनेत (ठाकरे) जागावाटपावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या मंगळवारी आणि बुधवारी झालेल्या बैठकीत कोणी किती जागा लढवायच्या याचे सूत्र निश्चित करण्यात आले. यानुसार काँग्रेस 85, शिवसेना (ठाकरे) 85 तर राष्ट्रवादी (शरद पवार) 85 जागा लढविण्यावर सहमती झाली आहे. आज मुंबईत शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत हे सूत्र ठरवण्यात आले. तसंच, उर्वरित जागा इतर मित्रपक्षांना देण्यात येणार आहेत.

विदर्भातील काही जागांवरून दोन्ही पक्षांमध्ये वाद निर्माण झाल्याचे सांगण्यात आले. मुंबईतील काही जागांवरही दोन्ही बाजूने ताणले गेल्याने पुन्हा चर्चा करण्यात आली. डावे पक्ष, समाजवादी पार्टी व अन्य छोट्या पक्षांना तिन्ही पक्षांनी आपापल्या कोट्यातून जागा सोडाव्यात, असा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, महाविकास आघाडीत कोण लहान भाऊ आणि कोण मोठा भाऊ यावरून वाद सुरू होता. परंतु, या जागा वाटपामुळे आता हा वादच संपुष्टात आला असून महविकास आघाडीत सर्वच समसमान आहेत.

## 'राज'पुत्रासमोर दुहेरी आव्हान, माहीममध्ये अमितविरोधात दोन्ही शिवसेनेचे उमेदवार



***मुंबई :*** *माहीम विधानसभा मतदारसंघातील निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी राज ठाकरे प्रयत्नशील असल्याच्या चर्चा मागील काही दिवस रंगल्या होत्या. मात्र, आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून, मंगळवारी रात्री उशिरा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं 45 उमेदवारांची यादी जाहीर केली. या यादीनुसार अमित ठाकरे यांच्या विरोधात माहीम विधानसभा मतदारसंघात सदा सरवणकर हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचं स्पष्ट झालं. तर, दुसरीकडे महाविकास आघाडीतून शिवसेना ठाकरे गटाच्या वतीनं महेश सावंत हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचं आता स्पष्ट झालंय. त्यामुळं 'राज'पुत्रासमोरील आव्हानं वाढली असून, या दुहेरी आव्हानाला अमित ठाकरे कशाप्रकारे तोंड देतात ते निवडणुकीच्या रणधुमाळीत स्पष्ट होईल.*

**सविस्तर वृत्त पान 3 वर**







## राष्ट्रवादी काँग्रेसच्या 38 उमेदवारांची घोषणा: बारामतीमधून अजित पवार, येवल्यातून छगन भुजबळ, तर परळीत धनंजय मुंडे रिंगणात

***मुंबई :*** *विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपल्या 38 उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. यामध्ये सर्वाधिक उत्सुकता होती ती बारामती विधानसभा मतदारसंघाची. आता अजित पवार हेच बारामती विधानसभा मतदारसंघातून एनसीपीचे उमेदवार असतील अशी घोषणा तटकरे यांनी केली. याबरोबरच येवल्यातून छगन भुजबळ तर परळीतून धनंजय मुंडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.*

*अजित पवारांच्या या यादीमध्ये नवाब मलीक आणि सुनील टिंगरे यांच्या नावाचा समावेश नाही. तर विद्यमान आमदार आणि मंत्र्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. यात छगन भुजबळ यांना पुन्हा एकदा येवला मतदार संघातून निवणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. वास्तविक राज्यात सुरु असलेल्या मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर भुजबळ विरुद्ध मनोज जरांगे यांच्यातील वाद समोर आला होता. त्यामुळे आता या मतदार संघातून भुजबळ यांच्या निवडणुकीकडे सर्वांचेच लक्ष असेल. तर दुसरीकडे राज्यातील विद्यमान मंत्री दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, धर्मराव बाबा आत्राम, आदिती तटकरे, अनिल पाटील, संजय बनसोडे यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. अजित पवार गटाच्या 38 उमेदवारांच्या पहिल्या यादीत माजी कॅबिनेट मंत्री नवाब मलिक, नाशिक जिल्ह्यातील निफाड मतदार संघाचे आमदार दिलीप बनकर, तर पुण्यातील आमदार सुनील टिंगरे यांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे या विद्यमान आमदारांचा पत्ता कट झाला का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यात नवाब मलिक यांना भाजपचा विरोध आहेत तर पुण्यातील हिट अँड रन प्रकरणात सुनील टिंगरे यांचे नाव समोर आल्यानंतर महायुतीला विरोधकांच्या टीकेला तोंड द्यावे लागले होते. त्यामुळे आता अजित पवार या तिन्ही आमदारांचा पत्ता कट करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.*

## मुख्यमंत्र्यांचा दिल्ली दौरा अचानक रद्द, फडणवीस आणि अजित पवार दिल्लीत

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौरा अचानक अखेर रद्द करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. एकनाथ शिंदे आज रात्री दिल्लीला जाणार होते. महायुतीच्या जागावाटपावर अंतिम तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिल्लीला जाणार असल्याची माहिती होती. एकनाथ शिंदे गोव्याहून दिल्लीला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली होती. पण शिंदे यांचा हा दौरा अचानक रद्द करण्यात आला आहे. शिंदे यांचा दिल्ली दौरा रद्द होण्यामागचं कारण अद्याप समोर आलेलं नाही.

दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिल्लीला गेले आहेत. त्यांची दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत चर्चा होणार आहे. या बैठकीत तीनही नेत्यांची महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागावाटपावर चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

भाजपकडून आतापर्यंत 99 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून 45 उमेदवारांची आणि अजित पवार गटाकडून 38 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. याचाच अर्थ महायुतीकडून आतापर्यंत एकूण 182 जागांवरील उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. अद्यापही 105 जागांचा तिढा कायम आहे. हा तिढा सोडवण्यासाठी दिल्लीत महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. जागावाटपावर चर्चा करण्यासाठी देवेंद्र फडणवीस आज दुपारीच दिल्लीला रवाना झाले होते. त्यानंतर संध्याकाळी अजित पवार दिल्लीला रवाना झाले. यानंतर एकनाथ शिंदे रात्री दिल्लीला जाणार असल्याची माहिती होती. पण शिंदे यांचा दौरा ऐनवेळी रद्द झाला.

## महत्त्वाचे

### हिजबुल्लाला आणखी एक झटका **हाशिम सैफुद्दीनचा इस्रायलने केला खात्मा**



**बैरुत :** हसन नसरल्लाहनंतर हिजबुल्लाचा नवा उत्तराधिकारी हाशिम सैफुद्दीनचाही इस्त्रायलने खात्मा केला आहे. या महिन्याच्या सुरुवातीला बैरुत येथील हवाई हल्ल्यात त्याचा खात्मा करण्यात आला होता. प्रमुख मारला गेल्याने हिजबुल्लाह हादरला असून प्रत्युत्तर करण्याची क्षमता कमी झाली आहे. तीन आठवड्यांपूर्वी झालेल्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा कार्यकारी परिषदेचा प्रमुख हाशिम सैफुद्दीन, हिजबुल्लाहच्या गुप्त निदेशालयाचा प्रमुख अली हुसैन आणि हिजबुल्लाह कमांडर यांचा खात्मा करण्यात आला. इस्त्रायली सेनेने एका निवेदनात दुजोरा दिला आहे. 4 ऑक्टोबर रोजी केलेल्या हल्ल्यात सैफुद्दीन याचा खात्मा करण्यात आला. आपला प्रमुख मारला गेल्याने हिजबुल्लाहला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, सैफुद्दीनच्या मृत्यूनंतर हिजबुल्लाहकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. बैरुत येथे मंगळवारीही इस्त्रायलने मोठा हल्ला केला होता. दरम्यान, इस्त्रायलच्या सैनिकांनी बेरुतमध्ये हिजबुल्लाहची मोठी संपत्ती मिळाल्याचा दावा केला आहे. एका रुग्णालयाच्या खाली असलेल्या बंकरमध्ये कोट्यावधींचे सोने आणि रोकड मिळाले. या बंकरला बराच काळ लपविण्यासाठी डिझाईन केले होते. ठार झालेले हिजबुल्लाह नेते सैय्यद हसन नसरल्लाहने अल सहेल रुग्णालयाच्या खाली बंकर बनवला होता, असे इस्त्रायलचे मुख्य लष्कर प्रवक्ते रिअल अॅडमिरल डॅनिअल हगारी यांनी सांगितले.

## गँगस्टर छोटा राजनला उच्च न्यायालयाचा दिलासा; **जन्मठेप स्थगित, जामीनही मिळाला**

**प्रतिनिधी**
■ **मुंई**



कुख्यात गुंड छोटा राजन याला मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी दिलासा देत त्याचा जामीन मंजूर केला आहे. हॉटेल व्यावसायिक जया शेट्टी यांची 2001 मध्ये हत्या करण्यात आली. या प्रकरणी 30 मे 2024 रोजी विशेष मोक्का न्यायालयाने छोटा राजनसह अन्य लोकांना दोषी ठरवत जन्मठेप सुनावण्यात आली. दरम्यान, उच्च न्यायालयाने छोटा राजनच्या जन्मठेपेच्या शिक्षेला देखील स्थगिती दिली आहे.

न्या. रेवती मोहिते – डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. छोटा राजनला एक लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर हा जामीन मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, अन्य प्रकरणांमध्ये छोटा राजन तुरुंगातच राहणार आहे. मे महिन्यातच विशेष न्यायालयाने हॉटेल व्यावसायिकाच्या हत्येप्रकरणी छोटा राजनला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, या शिक्षेविरोधात छोटा राजनने मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली होती. ही शिक्षा स्थगित करून आपल्याला अंतरिम जामीन दिला जावा, अशी त्याची मागणी होती.

## मुख्यमंत्री शिंदेंनी घेतले कामाख्या देवीचे घेतले दर्शन

**प्रतिनिधी**
■ **गुवाहाटी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी पहाटे गुवाहाटीला जाऊन तेथील कामाख्या देवीचे दर्शन घेतले. दुसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे यांच्या या दौऱ्यावर टीका केली आहे.


एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांपूर्वी शिवसेनेत बंडखोरी करत वेगळी चूल मांडली होती. त्यावेळी ते आपल्या समर्थक आमदारांसह प्रथम सुरतला व त्यानंतर गुवाहाटीला गेले होते. तेथूनच त्यांनी महाराष्ट्रात सत्ता स्थापन करण्याचा दावा केला होता. त्यावेळी त्यांनी आम्ही कामाख्या देवीच्या आशीर्वादाने सत्ता स्थापन करत असल्याचा



दावा केला होता. विशेषतः मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी सर्व आमदारांसह पुन्हा गुवाहाटीला जात कामाख्या देवीचे दर्शन घेतले होते. आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरही त्यांनी बुधवारी सकाळी गुवाहाटी गाठून सपत्नीक कामाख्या देवीचे दर्शन घेतले. शिंदे यांनी गुवाहाटीत पत्रकारांशीही संवाद साधला.

**पान 8 वर**

## महाराष्ट्राच्या स्वप्नात रेडे-म्हशींचा हंबरडा!



***मुंबई :*** *ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांच्या गुवाहाटी दौऱ्यावर आज जोरदार निशाणा साधला आहे. कालपासून महाराष्ट्राच्या स्वप्नामध्ये म्हशींचा हंबरडा ऐकू येत आहे. म्हशी बिचाऱ्या तडफडत आहेत. गोहत्या, गोवंश हत्या आहेच, पण प्राणीहत्या हा सुद्धा मनुष्यजातीला व मानवतेला कलंक आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून गुवाहाटीतून जे हंबरडे आम्हाला ऐकू येत आहेत, ते ऐकून राज्यातील जनतेचे मन विदीर्ण झाले आहे, असे राऊत म्हणाले.*

## सिद्धीकी हत्या प्रकरण

## लॉरेन्स बिश्नोईच्या भावाच्या संपर्कात होते आरोपी, खुनापूर्वी केला होता सराव

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्राचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येमध्ये सहभागी असलेल्या शूटर्सनी हल्ला करण्यापूर्वी किमान पाच वेळा गोळीबाराचा सराव केला होता. मुंबई पोलिसांनी सांगितले की, शूटर्सनी कर्जत-खोपोली रोडजवळच्या जंगलात शूटिंगचा सरावही केला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबा सिद्दीकी यांना लक्ष्य करण्यापूर्वी शूटर्सनी रायगड जिल्ह्यातील एका धबधब्याजवळील झाडावर गोळीबार करण्याचा सराव केला होता. सराव सुरू असताना आरोपींनी झाडावर पाच ते दहा गोळ्या झाडल्या. त्यांनी यावर्षी सप्टेंबरमध्ये हा सराव केला होता.

12 ऑक्टोबरच्या रात्री बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झिशानच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. गँगस्टर लॉरेन्स गँगने हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे. या टोळीने बाबांच्या हत्येमागे बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानला जबाबदार धरले होते. 20 ऑक्टोबरला सलमानला ईमेलद्वारे जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली होती. दरम्यान, मुंबई क्राईम ब्रँचने सांगितले की, 3 संशयित शूटर्स हत्येपूर्वी लॉरेन्स बिश्नोईचा लहान भाऊ अनमोल बिश्नोई याच्याशी बोलले होते. हे स्नॅपचॅटद्वारे केले गेले. अनमोल अमेरिका आणि कॅनडातून आरोपींच्या संपर्कात होता. आरोपींकडून चार मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

तत्पूर्वी, मुंबई पोलिसांनी घटनेच्या वेळी बाबा सिद्दीकी यांच्यासोबत उपस्थित असलेले पोलीस सुरक्षा रक्षक श्याम सोनवणे यांना निलंबित केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्दीकी यांच्यावर गोळ्या झाडणाऱ्या हल्लेखोरांवर कॉन्स्टेबल सोनवणे यांनी कोणतीही कारवाई केली नाही. पोलीस या कोनातून तपास करत आहेत.

याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी राम कनोजिया याने चौकशीदरम्यान सांगितले की, राष्ट्रवादीच्या नेत्याच्या हत्येचे कंत्राट त्यालाच दिले गेले होते आणि त्यासाठी त्याने एक कोटी रुपये मागितले होते. पोलिसांनी सांगितले की, यापूर्वी अटक करण्यात आलेल्या एका आरोपीच्या फोनमध्ये बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झिशान सिद्दीकीचा फोटो सापडला होता, जो त्याच्या हँडलरने स्नॅपचॅटद्वारे आरोपीला पाठवला होता.

## दहशतवादाचा सामना करताना दुटप्पीपणा नको : मोदी

**वृत्तसंस्था**
■ **कझान**

दहशतवाद ही जागतिक समस्या असून त्याचा सर्वांनाच धोका आहे. त्यामुळे दहशतवादाचा सामना करताना दुटप्पीपणास थारा नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्स शिखर परिषदेत बुधवारी केले आहे.

रशियातील कझान येथे 16 व्या ब्रिक्स शिखर परिषद झाली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परिषदेच्या सत्रास संबोधित केले. यावेळी ते म्हणाले, दहशतवाद आणि दहशतवादी वित्तपुरवठा यांचा सामना करण्यासाठी आपण सर्वांनी एकमताने एकत्र येऊन सर्वतोपरी सहकार्य केले पाहिजे. अशा गंभीर विषयावर दुटप्पीपणाला थारा नाही. आपल्या देशातील तरुणांमध्ये कट्टरतावाद रोखण्यासाठी आपण सक्रीय पावले उचलली पाहिजेत. संयुक्त राष्ट्रातील आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील व्यापक अधिवेशनाच्या प्रलंबित मुद्द्यावर आम्हाला एकत्र काम करावे लागेल. त्याचप्रमाणे,सायबर सुरक्षा, सुरक्षित आणि विश्वसनीय कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी जागतिक नियमनासाठी काम केले पाहिजे, असेही पंतप्रधान म्हणाले.

भारत संवादाचे समर्थन करत असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधानांनी यावेळी केला. ते पुढे म्हणाले, कोणताही संघर्ष असो अथवा युद्ध; त्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच सर्वोत्तम मार्ग आहे. सध्या जग युद्ध, संघर्ष, आर्थिक अनिश्चितता, हवामान बदल, दहशतवाद इत्यादी अनेक आव्हानांनी वेढलेले आहे. जगात उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम अशी फूट पडल्याची चर्चा आहे. महागाई रोखणे, अन्न सुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, जल सुरक्षा हे सर्व देशांचे प्राधान्याचे मुद्दे आहेत. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाच्या युगात, सायबर सुरक्षा, डीप फेक, चुकीची माहिती यांसारखी नवीन आव्हाने बनली आहेत.

### पाच वर्षांनंतर पंतप्रधान मोदी आणि जिनपिंग यांची द्विपक्षीय बैठक



*पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत पाच वर्षानंतर बुधवारी द्विपक्षीय चर्चेत भाग घेतला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांवर भाष्य केले. ते म्हणाले की, दहशतवादी सामना करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य केले पाहिजे. देशातील तरुणांमध्ये कट्टरतावाद रोखण्यासाठी आपण सक्रिय पाऊल टाकणे गरजेचे असल्याचे मोदी म्हणाले आहेत. आपण युद्ध नाहीतर शांततेला पाठिंबा देतो ज्यात एकत्रितपणे कोरोनासारख्या आव्हानाचा पराभव केला,*


अशा स्थितीत ब्रिक्सकडून अपेक्षा आहेत. त्यामुळे एक वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून ब्रिक्स सर्व मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका बजावू शकते असा आपला विश्वास आहे. ब्रिक्स हा फुटीरतावादी नसून सार्वजनिक हिताचा समूह असल्याचा संदेश आपण जगाला द्यायला हवा, असेही पंतप्रधानांनी यावेळी नमूद केले आहे.

**पान 8 वर**

## महत्त्वाचे

### तुर्कीची राजधानी अंकारामध्ये मोठा दहशतवादी हल्ला **10 जणांचा मृत्यू**

**अंकारा :** तुर्कीची राजधानी अंकारा येथील एव्हिएशन कंपनी तुर्की एरोस्पेस इंडस्ट्रीज (TUSAS) च्या मुख्यालयाबाहेर मोठा दहशतवादी हल्ला झालाय. दोन दहशतवाद्यांकडून येथे बेछुट गोळीबार सुरु आहे. येथे झालेल्या एका स्फोटात 10 जणांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर येत आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. प्राथमिक तपासात हा आत्मघातकी बॉम्बस्फोट हल्ला असल्याचे सांगण्यात येत आहे. तुर्कियाचे गृहमंत्री अली येरलिकाया यांनी हा दहशतवादी हल्ला असल्याचे म्हटले आहे. तुर्कीचे गृहमंत्री अली येरलिकाया यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर एक निवेदन जारी केले, ज्यात त्यांनी लिहिले की, "तुर्की एरोस्पेस इंडस्ट्रीजवर दहशतवादी हल्ला झालाय. दुर्दैवाने आमचे जवान शहीद झाले असून अनेक लोकं जखमी झाले आहेत. हल्ल्याच्या वेळी परिसरात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने सुरक्षित स्थळी पाठवण्यात आले असून सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला आहे. जखमींना रुग्णालयात नेण्यात येत आहे. अद्याप कोणत्याही संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. तुर्की अधिकाऱ्यांनी याला दहशतवादी हल्ला असल्याचे स्पष्ट केले आहे.



*मुंबई : शिवसेना शाखा क्रमांक 204 च्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे नागरिकांसाठी माजी नगरसेवक अनिल कोकीळ यांच्या सहकार्याने दिवाळीनिमित्त सुगंधी उटणे वाटप करण्यात आले. उटणे वाटपाचा कार्यक्रम शिवसेना आमदार अजय चौधरी यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळेस विधानसभा समन्वयक गौरी चौधरी, शाखाप्रमुख किरण तावडे, कांचन घाणेकर,शाखा समन्वयक समीक्षा परळकर, उपशाखाप्रमुख श्रीधर कारखानीस, प्रकाश सुर्वे, अमरदीप गोसावी, राजन पार्टे, नितीन दळवी आणि शिवसैनिक उपस्थित होते.*



## थोडक्यात

### डीएन नगर पोलिसांकडून सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

**मुंबई:** अंधेरी परिसरातील एका हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती डीएन नगर पोलिसांना मिळाली. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त परमजीत दहिया यांच्या परवानगीने, डीसीपी दीक्षित गेडाम आणि एसीपी कल्पना गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मच्छिंदर आणि पोलीस निरीक्षक खैरे यांच्या सहकार्याने उपनिरीक्षक अंजली वाणी यांनी सदर ठिकाणी धाड टाकली. डीएन नगर पोलिसांनी टाकलेल्या धाडीमध्ये या ठिकाणी सेक्स रॅकेट चालत असून एका महिलेला अटक करण्यात आली आहे. मीरा रोड येथील रहिवासी असलेल्या महिला दलाल नयना संजय रुपाणी यांच्यावर भारतीय न्यायदंड संहिता कलम 16,17 सह कलम 96, 98, 143 (3,143(4) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४,५ पीटा कलम ८१, ८७ जेजे कायद्यान्वये सापळा रचून आरोपी नयनाला घटनास्थळी पकडण्यात आले. त्यापैकी 1 अल्पवयीन मुलगी होती तिची सुटका करण्यात आली आहे. आरोपीकडून ओप्पो कंपनीचा मोबाईल, ५०० रुपयांच्या २ भारतीय नोटा आणि ५०० रुपयांच्या भारतीय बचत बँकेचे बंडल (बनावट नोट) जप्त करण्यात आले आहेत.

### डॉक्टर महिलेवर लैंगिक अत्याचार

**मुंबई:** एका डॉक्टर महिलेवर लैंगिक अत्याचार करून तिची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. बदनामीची भीती दाखवून तिच्याच विवाहित प्रियकराने तिच्याकडून आतापर्यंत एक कोटी रुपये उकळल्याचे तपासात उघडकीस आले आहे. याप्रकरणी अवेझ ताझिम अहमद या प्रियकराविरुद्ध एमआयडीसी पोलिसांनी सोमवारी (ता. २१) फसवणुकीसह लैंगिक अत्याचारप्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. तक्रारदार महिला ही कुर्ला येथे राहत असून ती व्यवसायाने डॉक्टर आहे. दोन वर्षांपूर्वी तिची सोशल मीडियावरून अवेझ याच्याशी मैत्री झाली होती. मैत्रीनंतर त्याने तिला लग्नासाठी प्रपोज केले होते. ती विवाहित असून एक मुलगी असल्याचे त्याला माहीत होती. लग्नानंतर या दोघांचा सांभाळ करण्याचे त्याने तिला आश्वासन दिले होते. लग्नाच्या भूलथापा देऊन त्याने तिच्यावर अनेकदा अंधेरीतील एअरपोर्टजवळील एका हॉटेलमध्ये लैंगिक अत्याचार केले होते. काही महिने सर्व सुरळीत सुरू असताना तो तिच्याकडे सतत पैशांची मागणी करत होता. याच कारणावरून त्यांच्यात खटके उडू लागले आणि तो तिला मारहाण करू लागला. त्यानंतर दोघांच्या संबंधाविषयीची माहिती नातेवाईक, मित्रमंडळींना देण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करत होता. या धमकीनंतर त्याने तिच्याकडून एक कोटी रुपये उकळले होते. याचदरम्यान तिला अवेझ हा विवाहित असून त्याने केवळ शारीरिक संबंधासाठी तिचा वापर केल्याचे लक्षात आले. त्यानंतर तिने त्याच्याविरुद्ध एमआयडीसी पोलिसांत तक्रार केली होती.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# विधानसभा निवडणुकीत उमेदवारांची चाचपणी सुरु; चेहरे गुलदस्त्यात

## वसई-नालासोपारा-बोईसरमध्ये स्थिती धूसर

प्रतिनिधी
■ वसई

महाराष्ट्र विधानसभा निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतसा पालघर जिल्ह्यात राजकीय हालचालींनी जोर पकडला आहे. प्रमुख राजकीय पक्ष त्यांच्या उमेदवारांची चाचपणी करत असून, काहींना अजूनही योग्य उमेदवार मिळवण्यात अडचणी येत आहेत. बहुजन विकास आघाडी, महाविकास आघाडी (मविआ), आणि महायुती या पक्षांनी काही मतदारसंघांत आपले उमेदवार जाहीर केले असले तरी इतर मतदारसंघांत उमेदवारांचे नाव निश्चित करण्यात विलंब होत आहे.

यंदाच्या निवडणुकीत मनसेसह इतर काही पक्षांनीही मैदानात उतरण्याचा निर्धार केला आहे. वसई, नालासोपारा आणि बोईसर या प्रमुख मतदारसंघांमध्ये मोठ्या शक्तिप्रदर्शनाची शक्यता आहे. वसईत विद्यमान तीन आमदार बहुजन विकास आघाडीच्या तिकिटावर पुन्हा एकदा निवडणूक लढवत आहेत. नालासोपारा मतदारसंघातून भाजपचे राजन नाईक यांना उमेदवारी मिळाली आहे. महाविकास आघाडीकडून विजय पाटील वसईत निवडणूक लढवत आहेत. मनसेनेही आपली ताकद दाखवून विनोद मोरे यांना नालासोपारात आणि सचिन शिंगडा यांना विक्रमगडमधून निवडणूक लढवण्यासाठी उतारले आहे.

ही विधानसभा निवडणूक सर्वच पक्षांसाठी मोठ्या चुरशीची ठरणार आहे. महायुतीला लोकसभेतील यश विधानसभेतही मिळणार का, हे पाहण्याची उत्सुकता आहे, कारण महाविकास आघाडी आणि बहुजन विकास आघाडी या पक्षांनी महायुतीला कडवे आव्हान उभे केले आहे.

# शिरसाड-वज्रेश्वरी मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

## नागरिकांची व वाहनचालकांची मोठी गैरसोय



प्रतिनिधी
■ वसई

पावसाळ्याच्या समाप्तीनंतर आता शिरसाड-वज्रेश्वरी मार्ग (राज्य मार्ग क्रमांक 40) गंभीर खड्ड्यांच्या समस्येमुळे नागरिक व वाहनचालकांना अत्यंत त्रासदायक ठरत आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्याच्या निकृष्ट दर्जाचा पाण्याने पुरता बळी घेतला असून, खड्ड्यांमुळे वाहतुकीत मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. नागरिकांनी या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण व योग्य दुरुस्तीची मागणी लावून धरली आहे.

शिरसाड, मांडवी व पारोळ डोंगरी या भागांमध्ये रस्त्याची अवस्था विशेषतः चिंताजनक आहे. या मार्गावरील खड्ड्यांचा आकार एवढा मोठा आहे की वाहनचालकांना त्यांच्या वाहनांची गती अतिशय मंद करावी लागते. पारोळ डोंगरी परिसरात सखल भाग असल्याने पाण्याचा निचरा न होता रस्त्यावरच साचतो. त्यामुळे रस्त्याची झीज होऊन मोठे खड्डे निर्माण होतात. या खड्ड्यांमुळे अवजड वाहनचालकांसाठी रस्ता पार करणे अत्यंत धोकादायक ठरले आहे.

सदर मार्ग इतका अरूंद आहे की दोन वाहने एकाच वेळी जाऊ शकत नाहीत, यामुळे वाहतुककोंडीचा त्रास प्रचंड प्रमाणात वाढला आहे. अपघातांच्या संख्येतही वाढ झाली आहे. याशिवाय गॅस पाईपलाईन अंथरण्यासाठी सुरू असलेले खोदकाम व रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेले बॅरिकेट्स हे वाहतुकीसाठी मोठे अडथळे ठरत आहेत.

पावसाने थोडी उसंत दिली असल्याने नागरिक आता प्रशासनाकडे या मार्गाचे तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी करत आहेत. या रस्त्याची गंभीर अवस्था लक्षात घेता प्रशासनाने यावर तत्काळ उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे नागरिक व वाहनचालकांचे मत आहे.

***धुळीकणांमुळे नागरिकांची गैरसोय***

*रस्त्याच्या खड्ड्यांमुळे फक्त वाहतुकीला त्रास होत नाही, तर धुळीकणांमुळे नागरिकांना श्वास घेणेही कठीण झाले आहे. वाहनचालकांना व आसपासच्या नागरिकांना या धुळीकणांचा सामना करताना शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रस्त्याच्या धुळीमुळे वाहनचालकांना त्यांच्या नाकातोंडात धुळ शिरून त्रास निर्माण होतो.*

# 'बेस्ट' वाचवण्यासाठी सर्व युनियनचे 'हम साथ साथ है'

## उपक्रमातील कामगार संघटनांनी बनवली 'कृती समिती'

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई मधील ४५ लाख बस प्रवासी आणि ११ लाख वीज ग्राहक वर्ग यांना सेवा देण्यासाठी तसेच सध्या कार्यरत असलेल्या २५ हजार बेस्ट मधील कामगार अधिकारी वर्गाचे भवितव्य राखण्यासाठी, बेस्ट उपक्रम टिकविण्यासाठी बेस्ट मधील कार्यरत असणा-या सर्व युनियन एकत्रित आल्या असून सदर युनियनच्या पदाधिकारी वर्गासोबत आपल्या दालनात बेस्टचे महाव्यवस्थापक व संबंधित अधिकारी वर्गासोबत आपण तात्काळ बैठकीचे आयोजन करावे. अशी विनंती बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

सदर बैठकीमध्ये बेस्ट उपक्रम, बेस्ट प्रवासी वर्ग आणि बेस्ट उपक्रमातील कामगार वर्ग यांचे कशा प्रकारे आपण नियोजन करुन त्यांना न्याय देऊ शकतो, याबद्दल आम्ही आपणास माहिती देऊ. असे नमूद करून हा विषय अतिशय गंभीर असून आपण तात्काळ बैठकीचे आयोजन करावे. असेही पत्रात शेवटी सुहास सामंत यांनी म्हटले आहे.

# वसई पूर्व-पश्चिम जोडणारा पुल अजूनही रखडलेला

## वाहतूककोंडीची समस्या तीव्र



प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल अजूनही अपूर्ण स्थितीत असून यामुळे नागरिकांना दररोज वाढत्या वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. केंद्र स्तरीय प्रकल्प जवळपास पूर्ण झाला असताना वसईतील हा किरकोळ उड्डाणपूल मात्र अजूनही रखडला आहे, आणि रेल्वेच्या तांत्रिक कारणांनी हा प्रकल्प वारंवार लांबणीवर पडत आहे.

शहरातील महत्त्वाचा मार्ग असल्याने या पुलाच्या अपूर्णतेमुळे दोन्ही बाजूंच्या रहिवाशांना आणि वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. नियमितपणे कामावर जाणाऱ्या कामगारांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनाच वाहतूककोंडीचा सामना करावा लागतो. पुलाच्या बांधकामाच्या दिरंगाईमुळे वसईतील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक दबाव वाढला आहे.

वसई पूर्व आणि पश्चिम भाग एकमेकांपासून वेगळे असून रेल्वे मार्गामुळे या दोन भागांतून दररोज हजारो लोक प्रवास करतात. हा पुल बांधण्यात आल्यास नागरिकांना दोन्ही भागांमध्ये सहज वाहतूक करता येईल आणि वाहतूककोंडीस आळा बसेल. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या विविध तांत्रिक अडचणींमुळे पुलाच्या बांधकामात होणारी वारंवार विलंब होणारी मोठी समस्या ठरली आहे. वाहतूककोंडीमुळे त्रस्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा या पुलाच्या रखडलेल्या कामाबद्दल प्रशासनाकडे तक्रार केली आहे. तरीही, अद्याप कोणतेही ठोस पाऊल उचलले गेलेले नाही. स्थानिक माजी नगरसेवक आणि राजकीय नेत्यांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या आहेत, पण कामाची गती वाढवण्याबाबत ठोस उपाय अद्याप होताना दिसत नाही. वसईतील या महत्त्वाच्या पुलाच्या कामात होणारा विलंब लोकांच्या दैनंदिन जीवनावर विपरित परिणाम करत आहे. स्थानिक प्रकल्पाचे काम योग्य वेळी पूर्ण न होणे आणि वारंवार होणारा विलंब हे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उभे करीत आहे.

# परळ स्थानकाजवळून सुटणाऱ्या बेस्ट बस बंद

■ मुंबई

मध्य रेल्वेवरील परळ (पूर्व) स्थानकाबाहेरून बेस्टतर्फे १६३ व १७७ क्रमांकाच्या बस सोडल्या जात होत्या. अचानक बेस्ट प्रशासनाने या बस बंद केल्याने प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत. या मार्गावर धावणाऱ्या बस त्वरित सुरू कराव्यात, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

परळ येथील वाडिया महिला व बालकांसाठीचे रुग्णालय, टाटा कॅन्सर रुग्णालय, केईएम सर्वसाधारण रुग्णालय येथे जाण्यासाठी रुग्ण व रुग्णांच्या नातेवाइकांसाठी या बस सोयीस्कर होत्या. स्थानकाजवळून सार्वजनिक वाहतुकीची सोय नव्हती. त्यामुळे रुग्णांना व त्यांच्यासोबत असलेल्या लोकांना टॅक्सीशिवाय पर्याय नव्हता. टॅक्सीसुद्धा वेळेत उपलब्ध होत नसे. त्यामुळे अनेकजण दादर येथून सरळ टॅक्सीमधून रुग्णालयात पोहोचत असत.

काही काळानंतर येथून शेअरिंग टॅक्सीची सुविधा सुरू झाली होती; मात्र अनेक रुग्णांना ही सुविधा घेणे परवडत नव्हते. मर्यादित टॅक्सी सुविधा असल्याने रुग्णांना अनेकदा ताटकळत राहावे लागत होते. यावर तोडगा म्हणून बेस्ट प्रशासनाने परळ (पूर्व) स्थानक ते शिवडी स्थानकादरम्यान बसची सुविधा सुरू केली होती. मिनी बस व तीही वातानुकूलित असल्याने रुग्ण व अन्य प्रवाशांची चांगली सोय झाली होती. त्यामुळे प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. बेस्ट प्रशासनाने अचानक या बस बंद केल्याने गरीब रुग्ण व प्रवाशांच्या खिशाला चाट बसत आहे.

# वसई-विरारमधील उड्डाणपूल हवेत; वाहतूककोंडीमुळे नागरिक त्रस्त

प्रतिनिधी
■ वसई

वसईतील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी 12 उड्डाणपूल आणि 6 अंतर्गत रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचा प्रस्ताव मांडला गेला होता. मात्र, प्रस्तावित उड्डाणपूल आणि रस्त्यांच्या कामांना अद्याप गती न मिळाल्याने या योजना हवेतच असल्याचे चित्र आहे. वसईच्या रस्त्यांवर वाढत्या वाहनगर्दीमुळे नागरिक आणि वाहनचालकांचे हाल होत आहेत, तर शासनाकडून फक्त निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अशा योजनांची घोषणा होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

वसईमध्ये नागरीकरण झपाट्याने वाढल्याने वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, सर्कल, मुख्य रस्ते आणि जोडरस्त्यांवर दररोज सकाळ, दुपार आणि संध्याकाळी वाहतुकीचा बोजवारा उडतो. अनेक ठिकाणी उड्डाणपूलांची तातडीने आवश्यकता आहे, मात्र अद्याप ते उभारलेले नाहीत. यामुळे नागरिक संतप्त आहेत.

नायगाव पूर्व परिसरातील मंजूर उड्डाणपूलांची कामे कासवगतीने सुरू असल्यामुळे वाहतूक सुधारण्याच्या प्रक्रियेला विलंब होत आहे. नायगाव पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे कामही रखडल्याने पूर्वेतील वाहतुकीचा ताण अधिक वाढला आहे. सततच्या वाहतूककोंडीमुळे वाहनचालकांचा वेळ वाया जात आहे, तर रिक्षाचालकांच्या व्यवसायावरही गंभीर परिणाम झाला आहे. यामुळे त्यांची उपजीविका धोक्यात आली आहे.

***वाहतुकीच्या समस्यांवर तोडगा कधी?***

*वसईतील वाहतूक व्यवस्थेचा गोंधळ आणि उड्डाणपूलांच्या कामात होणारा विलंब यामुळे स्थानिकांचा जीव मेटाकुटीस आला आहे. नागरिकांना त्वरित उपाययोजना आणि रस्ते, उड्डाणपूलांचा विकास हवा आहे, जेणेकरून वाहतुकीची कोंडी सुटेल आणि स्थानिकांना दिलासा मिळेल.*

# अनंत धनसरे यांची कविता विद्यापीठात बसून अभ्यासली जावी, इतकी महत्त्वाची आहे - ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. श्यामल गरुड




प्रतिनिधी
■ मुंबई

साहित्याच्या प्रस्थापित भिंतीवर बसून साहित्याचे मोजमाप करणाऱ्या व्यवस्थेला कवी अनंत धनसरे यांच्या एक सत्य ह्या दीर्घ कवितेची दखल घ्यावीचं लागेल. ही कविता वरवरचं बोलत नाही. तर जमिनीखालचा तळ ढवळून अनुभवातून उभी रहाते. आणि म्हणूनच ही कविता विद्यापीठात बसून अभ्यासली जावी इतकी महत्त्वाची आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. शामल गरुड यांनी केले.

घाटकोपर येथे माता रमाबाई आंबेडकर नगर येथील शहीद स्मारक सभागृहात कवी अनंत धनसरे यांच्या "एक सत्य" दीर्घ कवितेच्या प्रकाशन सोहळ्यात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष पालिकेचे माजी जनसंपर्क अधिकारी व जेष्ठ साहित्यिक शिवा इंगोले होते तर प्रमुख वक्ते डॉ. सुनील पवार, रविकिरण पराडकर आदी मान्यवर उपस्थित होते

श्यामल गरुड पुढे म्हणाल्या की, अनंत ची कविता ही समस्त आंबेडकरी स्त्रियांसाठी खूप बंधूभावाची आणि वेदनेची कविता आहे. या कवितेवर महत्त्वाची चर्चा होणे गरजेचे आहे. मला वाटते आंबेडकरी साहित्यातल्या दीर्घ कवितेतील ही कविता अनेक काळ चालेल. समकालीन, राजकीय, सामाजिक सगळ्या जगण्यावर अनंत बोलत असताना तो एका महत्त्वाच्या टप्प्यावर येतो आणि सुरुवातीपासून येणारी कविता प्रेयसी, पत्नी, आई, बहीण या समस्त आंबेडकरी स्त्री दुःख, वेदनेवर बोलता बोलता शेवटी तथागत बुद्धा जवळ येऊन थांबतो. कारण, तथागताचा मार्ग हा मुक्तीचा मार्ग आहे. नामदेव ढसाळ यांच्यानंतर दीर्घ कवितेची जी काही परंपरा आहे. त्या परंपरेला पुढे घेऊन जाणारी कविता अनंतने लिहिली आहे.

आजच्या दिवशी अनंताच्या दीर्घ कवितेचे प्रकाशन होत असताना आजचा दिवस एकिकडे आनंदाचा आहे आणि दूसरीकडे काळा दिवस आहे, मी गांभीर्याने बोलते. कारण आज गौरी लंकेशच्या आरोपींना जामीन मिळाला आहे. असेही त्या शेवटी म्हणाल्या.

***मुंबई : शिक्षक संघांचे माजी विधान परिषद सदस्य, जेष्ठ पत्रकार मा. कपिल पाटील यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल उत्तर पश्चिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मल्हारी भिसे यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.***



# टाटा मोटर्सकडून व्यावसायिक वाहन ग्राहकांसाठी 'कस्टमर केअर महोत्सव'

प्रतिनिधी
■ मुंबई

टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने व्यावसायिक वाहन ग्राहकांसाठी सर्वसमावेशक ग्राहक सहभाग उपक्रम 'कस्टमर केअर महोत्सव २०२४ 'च्या लाँचची घोषणा केली. हा उपक्रम २४ डिसेंबर २०२४ पर्यंत राबवण्यात येईल. हा अद्वितीय व मूल्यवर्धित उपक्रम देशभरातील २५०० हून अधिक अधिकृत सर्विस आऊटलेट्समध्ये आयोजित करण्यात येईल, जेथे ताफा मालक व ड्रायव्हर्स माहितीपूर्ण चर्चांसाठी एकत्र येतील. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहक अनेक फायद्यांचा आनंद घेऊ शकतात, जसे प्रशिक्षित टेक्निशियन्सकडून करण्यात येणारे बारकाईने वेईकल चेक-अप्स आणि मूल्यवर्धित सेवा. तसेच, ड्रायव्हर्सना सुरक्षित व इंधन-कार्यक्षम ड्रायव्हिंग पद्धतींबाबत व्यापक प्रशिक्षण आणि कंपनीच्या संपूर्ण सेवा २.० उपक्रमांतर्गत सर्वोत्तम ऑफरिंग्ज मिळतील.

# यशोदीप फाउंडेशन, विज्ञान सायन्स अकॅडमी यांचा स्तुत्य उपक्रम

# विक्रोळीत किल्ले प्रतिकृती बांधणी कार्यशाळा आणि किल्ले बांधणी स्पर्धा



प्रतिनिधी
■ मुंबई

यशोदीप फाउंडेशन आणि विज्ञान सायन्स अकॅडमी,विक्रोळी या संस्थांनी यंदाच्या दिवाळीच्या सुट्टीत युवा- बालचमूला थोडा वेळ मोबाईल पासून दूर ठेवून छत्रपती शिवाजी महाराजांची आणि त्यांच्या गड-किल्ल्यांची माहिती व्हावी, जिज्ञासा वाढावी या उद्देशाने एक स्तुत्य उपक्रम.राबविण्याचे ठरवले आहे. किल्ले प्रतिकृती कशी बनवावी याबाबत स्लाईड शोद्वारे सादरीकरण आणि व्याख्यान व किल्ले प्रतिकृती बनविण्याचे प्रात्यक्षिक रविवार २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत पार पडेल.त्यानंतर इच्छुक स्पर्धकांनी आपल्या मित्र मंडळींचा ग्रुप तयार करून २८ ते ३० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत आपल्या इमारतीच्या आवारात अथवा आपणांस सोयीस्कर अशा जागी किल्ले प्रतिकृती बनवावी.. त्यातील आकर्षक आणि नेटक्या प्रतिकृतींना आयोजकांतर्फे रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

रविवार २७ ऑक्टोबरला सायंकाळी ४ ते ५ वाजेपर्यंत अमोल पोवळे यांचे मातीचे गडकिल्ले कसे साकारावेत याबाबतचे व्याख्यान स्लाईड शोच्या माध्यमातून होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत ओंकार अकॅडेमी ऑफ आर्ट्सचे संचालक आणि प्रसिद्ध मूर्तिकार संदीप श्रीवर्धनकर हे किल्ले बनवण्याचे प्रात्यक्षिक उपस्थितांसमोर सादर करणार आहेत. हे कार्यक्रम श्री गणेश मैदान ,कन्नमवार नगर नंबर २ ,विक्रोळी (पूर्व ) ,मुंबई -८३ येथे आयोजित करण्यात आले आहेत.. त्यानंतर किल्ले साकारण्याची स्पर्धा २८ ते ३० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत पार पडणार आहे. सादर किल्ले प्रतिकृतींचे परीक्षण परीक्षकांमार्फत ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत केले जाणार आहे. किल्ल्यांची तंतोतंत प्रतिकृती करणाऱ्या ३ समूहांना पहिले पारितोषिक रुपये ५००१ ,दुसरे पारितोषिक रुपये ३००१ आणि तिसरे पारितोषिक रुपये २००१ अशी रोख पारितोषिके आयोजकांतर्फे देण्यात येणार आहेत. इच्छुक संस्था अथवा समूहांनी या स्पर्धेत अथवा प्रात्यक्षिकांत सहभागी होण्यासाठी कौस्तुभ प्रकाश सोनमळे (७०३९६४४३५० ) अथवा सौ प्रिया अनुप जाधव (९८७० २२००३७ ) यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा .

वकील : वर्षा बिऱ्हाडे

**जाहीर नोटीस**

**वसई येथील मा.श्री. एस.आर. निकम सह दिवाणी न्यायाधिश ब स्तर , वसई यांच्या कार्यालयात**

**ने.ता. २०/११/२०२४**
**चौ.अ.क्र. १४/२०२४**
**नि.क्र. ०५**

**Laila Nooralla Motani**
**Residing at 12/A, Milan Apt.**
**Diwanman, Vasai (W), Tal. Vasai, Dist. Palghar** **...Applicant**
**V/s**
**None** **....Respondent**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दि. ०४/०९/२०२४ रोजी Late Mrs. Zarina Ramzanali Pirani हे दि. ०७/०९/२०२१ रोजी मयत झाल असून त्यांच्या मालमत्तेसंबंधी वारस दाखला (सक्सेशन प्रमाणपत्र) मिळणेसाठी या न्यायालयात चौकशी अर्ज क्रमांक १४०/२०२४ दाखल केला आहे.

**Schedule of Property**

Movealbe Properties/Assests of Late Mrs. Zarina Ramzanali Pirani

| SR.NO. | Bank Name | Account Number | Amount |
|---|---|---|---|
| 1 | DCB Bank | 00725400010353 | 10,80,000/- |

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना माझ्या अशिलांन कडुन कळविण्यात येते की गाव गोजे निळेगोरे, ता- वसई, जि- पालघर, येथील सर्व्हे नं. १०२ व १०३, हया जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेली "लोटस अपार्टमेंट", "लोटस अपार्टमेंट कॉ ऑप ही सोसायटी लि", नालासोपारा (प), ता-वसई, जि-पालघर-४०१२०९, हया बिल्डिंग मधील रूम नं. ३०४, तिसरा मजला, "ए" विंग, बिल्डिंग नं. ५ए, सेक्टर नं. VII क्षेत्र ५३६ चौ फुट बिल्टिअप हा फ्लॅट दिनांक ०९/०५/२०११ रोजी रजिस्टर दस्त नं. वसई-३-६५०५-२०११ च्या नुसार माझे अशिल १) सुबोध सुहास गाडगीळ व २) शमिका सुबोध गडगीळ हयांनी कायमचा विकत घेतला असून १) सुबोध सुहास गाडगीळ व २) शमिका सुबोध गडगीळ हे सदर फ्लॅटचे मालक होते पण शमिका सुबोध गडगीळ, हे दिनांक ०७/०५/२०२४ रोजी मयत झाले त्यांच्या पश्चात त्यांना १) सुबोध सुहास गाडगीळ (पती), ३) आर्या सुबोध गाडगीळ (मूलगी) हे कायदेशरि वारस आहेत तरी आता सदरचा फ्लॅट त्यांना त्यांच्या नावावर करून विकावयाचा आहे तसेच वारस हक्काच्या कायदयानुसार सदर फ्लॅट हा वर नमूद केलेल्या वारसांच्या मालकीचा आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणाताही हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आम्हांस ऑफीस नं. १०२, पहिलामाळा, कुंती सदन, श्री मंगल कार्यालय हॉलच्या खाली, विर सावरकर गार्ग, विरार (पू), ता वसई, जि-पालघर, या पत्त्यावर लेखी पुराव्यासह कळवावा.

**ॲड. रंजन हाशा पाटील**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 124**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**


**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १२४**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई : मनसे महिला कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) मुंबई महिला अध्यक्षा आरती साळवी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. यावेळी पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.*



# माहीममध्ये अमित ठाकरेंसमोर दोन शिवसेनेंचे आव्हान

## ठाकरे सेना, शिंदे सेनेच्या उमेदवारांमुळे लढत तिरंगी







प्रतिनिधी
■ मुंबई

गेल्या २४ तासांपासून मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली आहे. याचे कारण म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) मंगळवारी पक्षाची दुसरी यादी जाहीर केली. ज्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहीम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. मनसेच्या यादीनंतर थोड्याच वेळात शिवसेना शिंदे गटाने त्यांची पहिली यादी जाहीर केली, ज्यात माहीम येथून विद्यमान आमदार सदा सरवणकर यांना उमेदवारी दिली गेली. तर बुधवारी २३ ऑक्टोबर रोजी उद्धव ठाकरेंनी दादरचे विभाग प्रमुख महेश सावंत यांची या मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली. यामुळे आता या मतदारसंघात दोन शिवसेना विरुद्ध मनसे अशी लढत पहायला मिळणार आहे.

१९९० पासून माहीम हा शिवसेनाचे बालेकिल्ला राहिला आहे. १९९० ते २००४ अशी सलग चार टर्म सुरेश गंभीर हे विजय झाले होते. त्यानंतर २००८ साली मतदासंघाची पुनर्रचना झाली आणि २००९ साली नितीन सरदेसाई यांनी मनसेच्या तिकीटावर विजय मिळवला. २०१४ आणि २०१९ साली हा मतदारसंघ पुन्हा एकदा शिवसेनेच्या ताब्यात आला. सदा सरवणकर यांनी बाजी मारली. आता २०२४ ला येथे चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. याचे मुख्य कारण म्हणजे राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे मैदानात उतरले आहेत.

### अमित ठाकरेंनी बाजी मारल्यास 'ऐतिहासिक विजय'

*विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे. जर त्या दिवशी अमित ठाकरे यांनी माहीममधून बाजी मारली तर तो एक ऐतिहासिक विजय ठरेल. याचे कारण म्हणजे हा मतदारसंघातील परिसर होय.माहीम विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे मुख्यालय शिवसेना भवन आहे. इतकेच नाही तर हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना ज्या शिवाजी पार्क मैदानावर केली ते देखील याच मतदारसंघात येते. जर अमित ठाकरे विजयी झाले तर ते ठाकरे कुटुंबातील पहिले सदस्य असतील जे शिवसेना भवन आणि शिवाजी पार्क या शिवसेनेशी संबंधित खास असलेल्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतील.अमित ठाकरेंच्या विजयासाठी राज ठाकरे आणि संपूर्ण मनसे मैदानात उतरेल. त्यांच्या समोर शिंदे गट आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना असेल. या मतदारसंघात काय निकाल लागतो याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.*

# बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधील शिक्षणाचा स्तर उंचावण्यावर भर द्या

## पालिका आयुक्तांचे आवाहन



प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये गुणवत्ता आहे. यासह व्यावसायिक शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणामध्ये आपले विद्यार्थी आणखी पुढे कसे जातील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याकरिता शाळांमध्ये नवनवीन उपक्रम राबविणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यावर भर देणे यासह शिक्षक-पालक संवाद आणखी वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी केले.

शिक्षण विभागातील अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकांची आढावा बैठक भायखळा (पूर्व) येथील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात काल आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून गगराणी बोलत होते.

यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, सह आयुक्त (महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय) चंद्रशेखर चोरे, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) राजेश कंकाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. राजू तडवी आदींसह शिक्षण विभागातील अधिकारी व सर्व मुख्याध्यापक या बैठकीस उपस्थित होते.

गगराणी म्हणाले की, शिक्षक हाच विद्यार्थी आणि पालकांच्या सर्वाधिक जवळ असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका खूप मोलाची आहे. रोजच्या शिक्षणासह तंत्रशिक्षण, मोबाईलच्या सहाय्याने शिक्षण कसे देता येईल, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करायला हवे. दहावीपर्यंतचे शिक्षण देत असताना स्पर्धा परीक्षांचेही शिक्षण देण्यावर भर द्या. ठराविक कालावधीनंतर विद्यार्थ्यांचे, त्यांच्या अभ्यासाचे मूल्यमापन करा. हे करीत असताना त्यांच्या पालकांनाही याबाबत वेळोवळी माहिती द्या.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांनी 'नॅशनल अचिव्हमेंट सर्वे २०२१' अहवालावर आधारित संगणकीय सादरीकरणाद्वारे आजच्या बैठकीत सर्व शाखांतील मुध्याध्यापकांशी संवाद साधला. तसेच सन २०२५ मध्ये हे सर्वेक्षण पुन्हा होणार आहे. त्यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या प्रगतीचा आलेख आणखी उंचवायला हवा, असे आवाहन त्यांनी अधिकारी-शिक्षकांना केले.

तर उप आयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे पालिका शाळांची माहिती, शाळांमध्ये राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती याबाबत माहिती दिली. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन - २०२७ पर्यंतचे व्हिजनही यावेळी मांडले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. राजेश कंकाळ यांनी प्रास्ताविक केले. बैठकीच्या सुरुवातीला अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकांना मतदानाचा टक्का वाढीसाठीची शपथ देण्यात आली.

# मुंबई विद्यापीठात 'बीबीए', 'बीसीए' अभ्यासक्रम रखडले

■ मुंबई

मुंबई विद्यापीठाकडे संबंधित अभ्यासमंडळ व अभ्यासक्रमच तयार नसल्याने शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'बीबीए' आणि 'बीसीए' हे अभ्यासक्रम सुरू करता आलेले नाहीत. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थी या अभ्यासक्रमापासून वंचित राहिले आहेत. मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'बीबीए' आणि 'बीसीए' हे अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यासाठी गांभीर्याने विचार करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बीबीए, बीसीए आणि बीएमएस हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद म्हणजेच 'एआयसीटीई'ने आपल्या अखत्यारित आणण्याचा निर्णय घेतला होता. तसेच हे अभ्यासक्रम राबवण्यासाठी महाविद्यालयांना 'एआयसीटीई'ची मंजुरीही अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर 'एआयसीटीई'च्या परिपत्रकानुसार या अभ्यासक्रमांसाठी बहुसंख्य व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी आवश्यक शुल्क भरून अर्ज केले होते. हे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू करण्यास मान्यताही मिळाली. त्यानंतर मुंबई विद्यापीठाकडे मान्यतेसाठी रितसर शुल्क भरून अर्ज सादर करण्यात आले. परंतु या अभ्यासक्रमांसाठी संबंधित अभ्यासमंडळ व अभ्यासक्रमच तयार नसल्याने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'बीबीए' आणि 'बीसीए' हे अभ्यासक्रम सुरू करता येणार नाही, असे मुंबई विद्यापीठाकडून संबंधित महाविद्यालयांना कळवले आहे.



*मुंबई : विक्रोळी विधानसभा मतदार संघातील निष्ठावंत शिवसैनिकांच्या कांजूर विभागातील मेळाव्यात शिवसेना नेते आमदार भास्करशेठ जाधव यांच्या उपस्थितीत शेकडो निष्ठावंत महिलांनी शिवबंधन बांधून आमदार सुनिल राऊत यांना प्रचंड मताधिक्यांनी निवडून देण्याचे संकेत दिले. सोबत विभागप्रमुख / आमदार रमेश कोरगांवकर, उपनेते दत्ता दळवी, म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनाध्यक्ष बाबा कदम, महिला आघाडीप्रमुख राजेश्वरी रेडकर, सिध्दी जाधव, युवासेना प्रमुख राजोल पाटील, सिनेट सदस्य परम यादव, शाखासंघटक सुशिला मंचेकर, शेखर जाधव, अनंत पाताडे, रश्मी पहुडकर, दिपाली पाटील, रवि महाडिक इ. कार्यकर्ते दिसत आहेत.*

# मध्य रेल्वेच्या कामकाजावर खासदारांच्या नाराजीनंतर रेल्वे स्थानकाचे सुशोभीकरण होणार

■ मुंबई

मध्य रेल्वेची समस्या संपण्याचे नाव घेत नसून मध्य रेल्वेच्या अनेक गाड्यांना विलंब होत असल्याने कामावर जाणा-या कर्मचा-यांना तसेच शाळा, महाविद्यालयात जाणा-या विद्यार्थ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. भांडुप, विक्रोळी येथे १५ डब्ब्यांच्या गाड्या तसेच कोकणला जाणा-या एक्सप्रेस गाड्या भांडुप येथे थांबविण्यात याव्यात, रेल्वे स्थानकांचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणी ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैशणव व मुंबई महाव्यवस्थापकांना पत्राव्दारे केली आहे. रेल्वेने दररोज सुमारे ४० लाख प्रवासी प्रवास करतात. मात्र गेल्या वर्षांपासून मध्य रेल्वे आपल्या वेळेपत्रकानुसार चालत नाही. याविलंबामुळे मध्ये रेल्वेच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागतात. त्याचा त्रास कामावर जाणा-या कर्मचा-यांना होत असतो. याबाबत खा. संजय दिना पाटील यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैशणव यांना पत्र लिहून यासमस्यांबाबत कार्यवाही करण्यास सांगितले होते. भांडुप येथे १५ डब्ब्यांच्या गाड्या थांबविण्यात याव्यात. प्लॅटफार्मची लांबी वाढविण्यात यावी, एक्सलेटर नसलेल्या रेल्वे स्थानकावर एक्सलेटरच्या सुविधा देण्यात याव्यात. अनेक सीसीटीव्ही बंद पडले असून ते चालू करण्यात यावे. सर्व रेल्वे स्थानकावर स्वच्छता ठेवावी, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन द्यावी तसेच प्रत्येक प्लॅटफार्मवर शौचालय दोन्ही दिशांना असायला हवे, गर्दीच्या वेळी रेल्वेतून पडून मृत्यू तसेच गंभीर जखमी होणा-यांची संख्या वाढत असून ती कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी, यासारख्या अनेक समस्यांबाबत रेल्वेच्या महाव्यवस्थापकांशी चर्चा करुन खा. संजय दिना पाटील यांनी पत्र दिले होते. या पत्राव्दारे त्यांनी मध्ये रेल्वेच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली होती. याची दखल घेत मुंबई विकास कार्पोरेशनच्या माध्यमातून मध्य रेल्वेच्या घाटकोपर, भांडुप, मुलुंड या रेल्वे स्थानकावर काम सुरु करण्यात आले आहे. या स्थानकाचे सुशोभीकरण करण्यात येणार असून प्लॅटफार्मची जागा वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांना प्लॅटफार्मवर उभे राहण्यासाठी अतिरिक्त जागा मिळणार आहे.

# उल्हासनगरातील पँथर नाना पवार रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश सचिव -ना. रामदास आठवले



प्रतिनिधी
■ मुंबई

पँथरच्या काळापासुन आंबेडकरी चळवळीत स्वतःला झोकुन देणारे उल्हासनगरमधील जुने पँथर माजी नगरसेवक नाना पवार यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली आहे.त्यांना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या हस्ते नियुक्त पत्र नुकतेच प्रदान करण्यात आले आहे.

रिपब्लिकन पक्षाचे (आठवले ) माजी जिल्हाध्यक्ष भगवान भालेराव यांच्यावर पक्षविरोधी कार्यवाही करण्याचाठपका ठेवून रामदास आठवले यांनी भालेराव यांना पक्षातुन काढून टाकले आहे. आठवले यांनी भालेराव यांच्या जागी शिवसेना शिंदे गटाचे शहर संघटक नाना बागुल यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. ज्येष्ठ पँथर माजी नगरसेवक नाना पवार यांच्यावर महाराष्ट्र सचिव पदाची जबाबदारी सोपवली आहे.

नाना पवार यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षाकडुन एकवेळेस नगरसेवक राहिले असुन त्यांच्या पत्नी पंचशीला पवार या तीन वेळेस नगरसेविका राहील्या आहेत.त्यांनी उपमहापौर पद ही सांभाळले आहे. या घडीला उल्हासनगर शहरात नाना पवार यांच्यासह सुरेश सावंत,बी.बी.मोरे,महादेव सोनावने,अरुण कांबळे,शांतारान निकम आदी जुने पँथर नेते रिपब्लिकन पक्षाचे संघटनात्मक बळ वाढवीत आहेत.

# कर्नाटक आणि तेलंगणाची बॉर्डर सील करा; शिंदे शिवसेना देणार आयोगाला निवेदन

## महाराष्ट्राच्या निवडणुकीत दोन्ही राज्यांतून शेकडो कोटी रुपये येण्याची भीती

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीची जबाबदारी काँग्रेसने कर्नाटक आणि तेलंगणामधील लोकांवर सोपवली असून येथून शेकडो कोटी रुपये महाराष्ट्रात येतील, अशी खळबळजनक माहिती शिवसेना सचिव व मुख्य प्रवक्ते किरण पावसकर यांनी दिली. या दोन्ही राज्यांच्या बॉर्डर सील करण्यासाठी निवडणूक आयोगाला निवेदन देणार असल्याचे ते म्हणाले. ते एका पत्रकार परिषदेत बोलत होते.

महाराष्ट्रातील निवडणुकीत पैशांचा खेळ होईल. महाविकास आघाडीकडे कर्नाटक आणि तेलंगणातून नव्हे तर परदेशातूनही पैसा येत आहे. या पैशांचीही चौकशी होणे आवश्यक आहे. यासाठी निवडणूक आयोगाकडे निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीत याच दोन राज्यांतून महाराष्ट्रात पैसा आला होता. याचा फटका महायुतीला बसला. त्यामुळे कर्नाटक आणि तेलंगणाची बॉर्डर सील करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. कुठेतरी छोटी रक्कम पकडल्याचे दाखवायचे आणि मोठे घबाड यांच्याच घरी पाठवायचे असा प्रकार सुरु आहे, असे ते म्हणाले.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार, मराठी माणूस आणि मराठी अस्मिता सोडणारे उबाठा किमान नातं तरी जपतील पण अमित ठाकरेंविरोधात माहिम मध्ये उमेदवार जाहीर करुन उबाठाने नातं देखील जपले नाही, अशी घणाघाती टीका पावसकर यांनी केली. मी आणि माझं कुंटुंब बाकी सगळे गेले तेल लावत, अशी उबाठाचा थाट असल्याची टीका त्यांनी केली. मात्र राहुल गांधी आणि सोनिया गांधी मागील आठ दिवस उबाठाला वेळ देत नसल्याने त्यांची जागा वाटपाबाबत कोंडी झाली आहे. असेही ते म्हणाले.

### एफडीएची दिवाळीनिमित्त खाद्यपदार्थ विक्रेत्यांविरोधात विशेष मोहीम

**मुंबई:** दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीनिमित्त मिठाई, खवा, पनीर तूप, खाद्यतेल, फरसाण, रवा, आटा, बेसन, मैदा, सुकामेवा आदी खाद्यपदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीची शक्यता लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) खाद्यपदार्थांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. विक्रेत्यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास त्यांच्याविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे. नागरिकांना सकस, भेसळमुक्त व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन नेहमीच कार्यरत असते. दिवाळीनिमित्त मिठाई, मावा उत्पादक व वितरकांनी ग्राहकांना दर्जेदार ताजी व सकस मिठाईची विक्री करावी, अन्न विषबाधेसारखा अनुचित प्रकार घडू नये यासाठी त्यांना कोणती खबरदारी घ्यावी, तसेच परवाना अटींचे उल्लंघन करू नये याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून अन्न व्यवसायिकांना




***मुंबई : पार्टी ऑफ इंडिया (खरात) मुंबई प्रदेश अध्यक्ष राजू थाटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) यांना मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद घेऊन जाहीर पाठिंबा दिला. यावेळी रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (खरात गटाचे) अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.***

# शहरी वाहतुकीवर शाश्वत तोडगा काढण्याच्या मागणीसाठी नागरिकांचे विविध गट एकत्र

■ मुंबई

सस्टेनेबल मोबिलिटी नेटवर्क (एसएमएन) च्या सहायाने परिसर, वातावरण आणि यंग लीडर्स फॉर ॲक्टिव्ह सिटिझनशिप (वायएलएसी) यांनी 'महाराष्ट्र शहरी वाहतूक सनद' (महाराष्ट्र अर्बन मोबिलिटी चार्टर ऑफ डिमांड) तयार केली आहे. निवडणुकांपूर्वी सार्वजनिक धोरण आणि राजकीय अजेंड्यांवर प्रभाव पाडणे, राज्यातील गंभीर शहरी वाहतुकीच्या आव्हानांचा सामना करणे, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सर्वांसाठी न्याय्य वाहतूक उपाययोजना उपलब्ध करणे हा या एकत्रित प्रयत्नाचा उद्देश आहे.

परिसरचे कार्यक्रम संचालक रणजित गाडगीळ यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सामूहिक कृतीच्या महत्त्वावर भर दिला,"महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २० नोव्हेंबरला होणार असल्याने, राज्यासाठी अधिक कार्यक्षम, न्याय्य आणि शाश्वत वाहतूक आराखड्यासाठी नागरिकांनी सहभागी होण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण संधी आहे. धोरणकर्ते, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी या मागण्यांना प्राधान्य दिले पाहिजे आणि अधिक सक्षम आणि सर्वसमावेशक शहरी भविष्यासाठी एकत्र काम केले पाहिजे. राज्याच्या विकासाला आकार देण्यासाठी आणि आजच्या तसेच येणाऱ्या पिढ्यांच्या गरजा पूर्ण करणारी वाहतूक व्यवस्था तयार करण्याची ही एक संधी आहे," असे त्यांनी नमूद केले.

# हंसा कंपनीने बेस्ट मध्ये बस चालविण्यास दर्शवली असमर्थता

## प्रवाशांचे हाल सुरूच

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमात भाडेतत्त्वावर सुरू असलेल्या हंसा कंपनीच्या २६२ मिडी एसी बसेस १० ऑक्टोंबर पासून बंद केल्या आहेत. काल कुलाबा येथील बेस्ट भवन मध्ये कंपनी व बेस्ट प्रशासन यांच्यात बैठक झाली पण या बैठकीतही भाडेतत्त्वावरील कंत्राटदाराने या कराराची पुढील कार्यवाही करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे बेस्ट व कंत्राटदार यांच्यात झालेला करार लवकरच संपुष्टात आणण्याबाबत कायदेशीर कार्यवाही सुरू केली जाईल. असे बेस्ट च्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले.

याच महिन्याच्या १० तारखेपासून हंसा कंपनीने आपल्या मिडी एसी बसेस चालविण्याचे बंद केले आहे. हंसाच्या २६२ बसेस मरोळ, दिंडोशी व ओशिवरा बस आगारात कार्यरत होत्या.तसेच काही बसेस शिवडी व काळाचौकी परिसरातही धावत होत्या. या बसेस अचानक बंद झाल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. या मिडी एसी बसेस ज्या मार्गावर धावत होत्या त्या मार्गावर बेस्ट ने स्वमालकीच्या बसेस सुरू केल्या आहेत. पण त्यांची संख्या अत्यंत कमी असल्याने प्रवाश्यांना तासनतास उन्हातान्हात ऑक्टोंबर हिट चे चटके खात बस स्थानकात आणि मार्गावरील थांब्यावर उभे राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांचा जीव मेटाकुटीला येऊन ते बेस्ट चा उद्धार करत आहेत. या पूर्वीही एस पी ग्रुप च्या ४०० मिडी बस त्यांनी बंद केल्या आहेत. अजून दुसऱ्या ही कंपन्या आपल्या भाडेतत्वावरील बसेस बंद करण्याच्या मार्गावर आहेत.

बस स्थानकातही एक एक तास उभे असलेले प्रवासी बस स्थानकातील अधिकाऱ्यांना विचारायला गेले तर बसेस च कमी आहे त्याला आम्ही काय करणार ? असे उत्तर त्यांच्याकडून मिळत असते. पण बस स्थानकात बसेस उभ्या असतात व बस थांब्यावर प्रवाशांची मोठी रांग लागलेली असते. तरी बेस्ट चे कर्मचारी त्यांची बसगाडी काढण्याची वेळ जो पर्यंत होत नाही तो पर्यंत ते ती बस काढत नाहीत. असा अनुभव प्रवासी सध्या घेत आहेत.

बेस्ट उपक्रमात सध्या १०४७ बस आहेत.त्या पैकी ५५० बसेस या डिसेंबर अखेर आयुर्मान पूर्ण झाल्याने तफ्यातून काढाव्या लागणार आहेत. तर उर्वरित बस ऑक्टोंबर २०२६ मध्ये भंगारात जाणार आहेत. तरीही बेस्ट ने नव्याने २९०० बसेसची दिलेली ऑर्डर पूर्ण होत नसल्याने त्या बसेस ताफ्यात येताना दिसत नाही. बेस्ट च्या स्वमालकीच्या बसेसची कमी होणारी संख्या आणि भाडेतत्वावरील एक एक कंपनी आपल्या बस गाड्या चालविण्यास असमर्थता दाखवत असल्यामुळे प्रवाशांच्या त्रासाकडे मात्र लक्ष द्यायला कुणाकडेही आज वेळ नाही. कारण सर्व राजकीय पक्ष विधानसभा निवडणुकीत गुंतले आहेत त्यांना लोकांच्या प्रश्नांकडे वा त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आज तरी वेळ नाही. निवडणूक संपेपर्यंत तरी लोकांना त्रासाला सामोरे जावेच लागणार आहे. असा संदेश च बेस्ट ने प्रवाश्यांना दिला असल्याचे मत प्रवासी व्यक्त करीत आहेत.

### धनेश पक्ष्यांची सुटका


**मुंबई:** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकवरून तस्करी केलेले चार धनेश पक्षी (हॉर्नबिल) सीमाशुल्क विभागाने ताब्यात घेतले. तस्करी करणाऱ्या दोन भारतीय प्रवाशांना अटक करण्यात आली. विमानतळावर सोमवारी उतरलेल्या दोन प्रवाशांचे सामान संशयास्पद दिसल्यामुळे झडती घेण्यात आली. त्यांच्या सामानात दोन चॉकलेट भरलेले डबे आणि चॉकलेटखाली चार धनेश पक्षी सापडले. या पक्ष्यांची थायलंडमधून तस्करी करण्यात आली होती. सीमाशुल्क विभाग, वाईल्ड लाइफ क्राइम कंट्रोल ब्युरो, वन विभाग आणि रेस्किंक असोसिएशन फॉर वाइल्ड लाइफ वेलफेअर (रॉ) यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत तस्करी केलेले चार धनेश पक्षी ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक उपचार करून ते पुन्हा थायलंडला रवाना करण्यात आले.

**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**
**एसी कोचेसचे इलेक्ट्रीकल एएमसी**
**खुला ई-बोली सूचना क्र. ११/२०२४ दि. १७.१०.२०२४**
भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे खुली ई-बोली मागवित आहेत. कामाचे नाव: तीन वर्षांच्या कालावधीसाठी मध्य रेल्वेच्या मेल/ एक्स्प्रेस गाड्यांच्या आरएमपीयू प्रकारच्या एसी कोचेसमध्ये बसविण्यात आलेल्या इलेक्ट्रोवेवज बनावटीच्या २५ केव्हीए इन्व्हर्टरचे वार्षिक देखभाल कंत्राट. (निविदा क्र. बीबी.एलजी.डब्ल्यू.सीएसएमटी.२०२४.१३) कामाचे अंदाजे मूल्य: रु. ३,२४,२०,७३६/-. इरठे: रु. ३,१२,१००/- वैधता: ६० दिवस. पूर्तता कालावधी: ३६ महिने, निविदा समाप्ती दिनांक: १८/११/२०२४ रोजी १३.०० वा. बोलीदारांना सूचना : १. अंतिम तारखेनंतर निविदा उघडल्या जातील. २. संभाव्य बोलीदारांना अधिक तपशिलांसाठी आमच्या www.ireps.gov.in वेबसाइटला भेट देण्याची विनंती करण्यात आली आहे, जर असेल तर निविदा आणि शुद्धीपत्र. ३. बोलीदार आमच्या www.ireps.gov.in या वेबसाइटद्वारे वरील ई-निविदेत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी होऊ शकतात. केवळ ई-निविदेवर मॅन्युअल ऑफर सादर करण्याची परवानगी नाही. व्यक्तिचलितपणे, सबमिट केल्यास ते उघडले जाणार नाही किंवा विचारात घेतले जाणार नाही. ४. पुढील चौकशीसाठी वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (कोचिंग), ॲनेक्स बिल्डिंग, पहिला मजला, मध्य रेल्वे, सीएसएमटी मुंबई यांच्याशी संपर्क साधावा. ५. ही बोली सार्वजनिक खरेदी धोरण (मेक इन इंडिया) आदेश २०१७ चे दिनांकित १५.०६.२०१७ पालन करते औद्योगिक प्रोत्साहन आणि धोरण विभाग, वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेले, रेल्वे बोर्ड पत्र क्र. २०१५/आरएस(जी)/७७९/५ दिनांक ०३.०८.२०१७ आणि २७/१२/२०१७.
SUN 490 वरी. विभागिय विद्युत अभियंता (कोचिंग)
असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है


# डिजिटल परिवर्तनाला गती देण्यासाठी 'सेल्सफोर्स'चे 'टीसीपीएल'बरोबर सहकार्य

■ मुंबई

ग्राहक व्यवस्थापन संबंधांवर (साआरएम) आधारित 'सेल्सफोर्स' कंपनीने (एनवायएसई : सीआरएम) टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड (टीसीपीएल) या ग्राहकोपयोगी वस्तू उत्पादक कंपनीबरोबर एक धोरणात्मक सहयोग जाहीर केला. याद्वारे डिजिटल परिवर्तनाचा प्रवास अधिक वेगात करणे शक्य होणार आहे. या नेक्स्ट जनरेशन 'गो-टू-मार्केट' (जीटीएम) प्लॅटफॉर्मच्या शुभारंभाद्वारे 'टीसीपीएल'ला विक्री आणि वितरणातील उल्लेखनीय गती आणि कार्यक्षमतेसह क्रांती घडवणे शक्य होणार आहे.सेल्सफोर्स सेल्स क्लाऊड, सर्व्हिस क्लाऊड, प्लॅटफॉर्म, म्युलसॉफ्टची अंमलबजावणी करण्याचा 'टीसीपीएल'चा निर्णय ग्राहकांचा अनुभव वाढवण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाद्वारे डिजिटल आणि डेटा-चालित संस्थेत रूपांतर करण्याच्या दृष्टीकोनाशी संरेखित करण्यात आला आहे. 'सेल्सफोर्स'च्या प्रगत डेटा व्यवस्थापन आणि एआय क्षमतेचा लाभ घेत 'टीसीपीएल'ने उल्लेखनीय गती आणि कार्यक्षमतेसह डिजिटल परिवर्तनालाही वेग दिला आहे.



जेव्हा तुम्ही स्वप्नाने सुरुवात करता आणि उत्कटतेने काम करता तेव्हा यश अपरिहार्य असते.



- रतन टाटा
प्रसिध्द उद्योगपती


वृत्तमानस
मुंबई, गुरुवार, २४ ऑक्टोबर २०२४

# घरात धोका आहे...

भारतामध्ये दीडशे दोनशे वर्षांपूर्वी बालविवाह करण्याची प्रथा होती. मुलीला बाल वयातच लैंगिक भ्रष्टाचाराला सामोरे जावे. दुर्दैवासाठी तिच्या समाज मान्यता देखील होती आणि काही प्रमाणात राजाश्रय सुद्धा. म्हणूनच त्याकाळी महिलेवर होणाऱ्या लैंगिकता चावला कोणी वाले नव्हता. ज्यांच्या हातात कायदे करण्याचे ताकत होती तेच अन्याय पद्धतीने वागत होते. सुदैवाने बालविवाची खूप आता बंद पाडण्यात आली आहे. मात्र असे असले तरी बाल लैंगिकता काही संपलेली नाही. बाललैंगिक शोषण ही एक जागतिक समस्या असून त्यात दिवसेंदिवस पडत असणारी भर हा एक चिंतेचा विषय आहे. जागतिक कन्या दिवस नुकताच साजरा झाला असला तरी ही समस्या उग्र रूप धरण करीत असल्याचे चित्र जगभरात दिसते. एका अहवालानुसार जगात आजवर सुमारे ३८० दशलक्षाहून जास्त स्त्रिया आणि मुली लैंगिक हिंसाचाराला बळी पडल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे आजही आठपैकी एक मुलगी वयाची अठरा वर्षे पूर्ण होण्याआधीच लैंगिक हिंसाचाराची शिकार होते, असे स्पष्ट झाले आहे. कितीही कठोर कायदे केले तरी याला आळा घालणे मोठे आव्हान आहे. त्यातूनच निर्माण होणाऱ्या अल्पवयीन मातृत्वाची गंभीर समस्या हा एक वेगळाच मुद्दासुद्धा गांभीर्याने पाहिला पाहिजे. याबाबतच्या युनिसेफच्या अहवालानुसार सुमारे १३ टक्के मुलींवर अशा प्रकारचे मातृत्व लादले जाते. आफ्रिका खंडातील सहारा वाळवंटाखालील देशांमध्ये तर हे प्रमाण २५ टक्के तर दक्षिण आशियात ते १० टक्के इतके आहे. अशा घटनांमध्ये सुमारे २० टक्के घटना बाललैंगिक अत्याचार या सदरात मोडतात. त्यावरील वयोगटांमध्ये ३३ टक्के प्रकरणांमध्ये बलात्कार हे मातृत्वाचे कारण असते. बालविवाह यासाठी कळीचा मुद्दा ठरत आहे. राज्यातसुद्धा गेल्या काही दिवसांत असे अनेक बालविवाह थांबविण्यात यश आले असले तरी चोरी छुपे हे प्रकार सुरू आहेत. केवळ गावखेड्यात नव्हे तर महानगरामधील अनेक झोपडपट्टी भागात हे प्रमाण जास्त आहे. गरिबी हे तर अत्यंत महत्त्वाचे कारण आहे. दारिद्र्यरेषेखालील पालकांकडून आपल्या मुलांच्या मूलभूत गरजादेखील पुरवल्या जात नाहीत. त्यामुळे अशा कुटुंबांमधील काही मुली नाइलाजाने परिचयातील सधन पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवून त्या बदल्यात पैसे आणि इच्छित वस्तू मिळवतात असे स्पष्ट होते. १५ वर्षांच्या आतील ६० टक्के मुलींचे तर ३५ टक्के मुलांचे जवळच्या व्यक्तींकडूनच शोषण झाल्याचे धक्कादायक वास्तव एका पाहणीमध्ये आढळले आहे. मुले म्हणजे देवाघरची फुले या उक्तीला लाजिरवाणी, न साजेशी अपकृत्ये जेव्हा भोवतालच्या समाजात घडून येताना आढळतात तेव्हा मुलांचे बालपण त्यांच्यापासून हिरावून घेणाऱ्या, त्यांना कुस्करणाऱ्या कुप्रवृत्तींचा राग सर्वांना आल्यावाचून राहत नाही. परंतु कौटुंबिक किंवा सामाजिक पातळीवर हे विषय उघडपणे मांडणे हेही अनेकदा निषिद्ध मानले जाते. अतिशय गंभीर अशा ह्या विषयावर घरात किंवा घराबाहेरही चर्चा विचार करण्यास लोक अनुत्सुक दिसतात. माझा काय संबंध ? या प्रवृत्तीपासून ते असले विषय दूर राहिलेलेच बरे इथपर्यंत असलेली सामाजिक उदासीनता कायदा - सुव्यवस्थे आणि समाजाला घातकच ठरते. मात्र त्यामुळे वस्तुस्थिती लपत वा बदलत नाही उलट अधिकच बिकट होत जाते. मुळातच जास्त लोकसंख्येच्या देशांमध्ये, भागांमध्ये लैंगिक हिंसाचाराच्या संख्याही जास्त आढळतात. भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक सीमारेखा ओलांडून या हिंसाचाराने सगळी क्षेत्रे व्यापली आहेत. एकूण लैंगिक हिंसाचाराच्या घटनेच्या ३४ टक्के घटना ओशियाना भागात घडल्या आहेत. लैंगिक हिंसाचारी जर पकडले गेले नाहीत तर ते पीडित मुलांवर वारंवार अत्याचार करीत राहतात. त्यामुळे हिंसाचाराची माहिती मिळताच त्यावर उपाययोजना करणे गरजेचे असते, ज्यामुळे हे चक्र तोडता येऊ शकतं. याचे नंतरचे परिणाम कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो. लैंगिक हिंसाचाराचे बळी पडलेले पुढे लैंगिक गुप्तरोग, अमली पदार्थांचे वाढते व्यसन, सामाजिक एकटेपणा, मानसिक रोग यांनाही बळी पडू शकतात. मुलं जेव्हा त्यांच्याविषयीचे अनुभव दीर्घकाळ लपवून बसतात किंवा उशिरा त्याविषयी बोलतात तेव्हा त्याचा आघात जास्त तीव्र असतो. त्यामुळे योग्य वेळ निघून गेलेली असते. स्त्रिया आणि मुलींना लैंगिक हिंसाचाराचा जास्त सामना करावा लागतो आणि त्यांची माहिती अधिक विस्तृतपणे संकलित होते. पण पुरुष आणि मुलांनाही याचा सामना करावा लागतो असं दिसून आलं आहे. लैंगिक हिंसाचार थोपवण्यासाठी आणि मुलांना सुरक्षित जगणं देण्यासाठी तातडीची उपाययोजना करणं गरजेचं आहे. यात लैंगिक हिंसाचार वाढवणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक प्रथांना आव्हान देणं, मुलांना वयात येताच योग्य ते लैंगिक शिक्षण व माहिती देणं, ज्यामुळे ते लैंगिक हिंसाचार ओळखू शकतील आणि त्याविषयी सांगू शकतील, असे उपाय अमलात आणणे आवश्यक आहे. त्याचबरोबर हेदेखील निश्चित करणे गरजेचे आहे की हिंसाग्रस्त मुलांना योग्य उपचार, समुपदेशन मिळेल त्यांना न्याय मिळेल ज्यामुळे भविष्यात त्यांना अशा गोष्टींना सामोरे जावे लागणार नाही. सूड किंवा बदला घेण्यासाठी लहान मुलामुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण देशभर वाढत असून, एकूण गुन्ह्यांतील जवळपास दहा टक्के गुन्हे असे असतात. याचा अर्थ मोठ्या माणसांच्या भांडणांची किंवा वैराची किंमत निष्पाप मुले चुकवत असतात. गेल्या काही वर्षांत मुलांवरील अत्याचारांच्या विरोधातले कायदे कडक झाले आहेत. अनेकदा राज्य सरकारे अशा खटल्यांसाठी शीघ्रगती न्यायालयेही नेमतात. मात्र एक सामाजिक संकट किंवा लहान मुलामुलींची समाजावर असणारी सामूहिक जबाबदारी या अंगाने देशभरात गंभीर प्रयत्न होताना दिसत नाहीत. एकीकडे प्रगतीची किंवा समृद्धीची चित्रे रंगवताना राज्यकर्ते व नोकरशहा रंगून जातात. पण भारतातील सामाजिक जीवन अल्पवयीन बालकांसाठी किती अंगांनी असुरक्षित व भयकारी बनले आहे, यावर मात्र कधीही गंभीर चर्चा होत नाही. लहान मुले ही समाजाचा दुर्बल घटक मानली जातात. कारण ती आपल्या योगक्षेमासाठी, पालन- पोषणासाठी मोठ्यांवर अवलंबून असतात. परंतु दुर्दैवाने ह्या दुर्बल घटकाचे शोषण सर्वाधिकरीत्या समाजात दिसून येते. हिंसाचार, शिव्या, मारामाऱ्या, आतंकवाद ह्यांना सध्याची लहान मुलांची पिढी प्रत्यक्ष व प्रसारमाध्यमांतून रोजच सामोरी जात असते, हे नाकारून चालणार नाही. पालकांनी किंवा शिक्षकांनी मुलांना मारणे, स्त्रीभ्रूणहत्या, मुलीला जन्मानंतर नष्ट करणे, जातिभेद किंवा धर्मामुळे पोळली जाणारी मुले, मुलींची कुटुंबात व समाजात होणारी अवहेलना, बालविवाह, बलात्कार, छळ अशा अनेक परिस्थितींचा, वस्तुस्थितीचा सामना आजच्या मुलामुलींना करायला लागतो. घटनेने बालकांना हक्क दिले आहेत, पण त्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी साऱ्या समाजाने एक होऊन काम करण्याची गरज आहे. प्रत्येकाने आपापला खारीचा वाटा उचलला तरी आपण समाजात मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करू शकू. त्यांचे बालपण अबाधित राखण्यात यश येऊ शकते. त्यासाठी गरज आहे ती सर्वांनी संवेदनशीलपणे त्यात आपला सहभाग नोंदविण्याचे. असे झाले तरच उमलणाऱ्या कळया खऱ्याने फुलतील. अन्यथा जे अन्याय अत्याचार राजा महाराजांच्या काळात होते होते, बालविवाहाला मान्यता असल्याने अशा अत्याचाराला कायद्याचे संरक्षण होते. समाजाचा पाठिंबा होता. तो संविधानाने नष्ट केला आहे. त्यामुळे संविधानाच्या या बालसंरक्षण अधिकाराचे जतन झाले पाहिजे. त्यांच्यावरील लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना कठोर शासन झाले पाहिजे त्यासाठी अधिक कठोर होणे आणि समाजाने विज्ञानवादी विचाराने वागणे आवश्यक आहे.

# रतन टाटा
## जमिनीशी नाळ जोडलेला आकाशाच्या उंची एवढा माणूस !



**सातारासारख्या** शहरातून येऊन जेंव्हा एअर इंडिया मध्ये नोकरी मिळाली तेंव्हाच भरभरून काही मिळाल्याचा आनंद झाला. पण एवढं मिळेल याची कल्पनाही सुरुवातीला नव्हती. मी एअर इंडिया बिल्डिंग, नरिमन पॉईंट येथे काही वर्ष काम केले. नंतर माझी ट्रान्सफर इंटरनॅशनल एअरपोर्टला झाली वेगवेगळे विभाग आहेत तसेच एक स्पेशल हॅंडलिंग म्हणजेच व्हीआयपी सीआयपी सेलिब्रिटीज यांच्यासाठी. त्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी एक वेगळा विभाग आहे. त्यात माझी नियुक्ती झाली आणि विचार करू शकत नाही एवढ्या मोठ्या लोकांना भेटण्याचा योग आला. माझे एकच ध्येय होतं की जे काम करायचं ते अगदी मनापासून करायचं, त्यात कुठलाही स्वार्थ नसायचा. त्यामुळे खूप व्हीआयपींना भेटले, पण कुठल्या आशेने त्यांच्याकडे मी कधीच पाहिलं नाही आणि एक दिवस पद्मविभूषण रतन टाटांना भेटण्याचा योग आला. योग आला म्हणजे माझी ड्युटी होती त्यांना सुविधा उपलब्ध करून देरण्याची. थोडी घाबरले होते पण म्हटलं की नाही आपण आपलं काम चोख करायचं. त्याप्रमाणे आम्ही प्रत्येक व्हीआयपींना गेट पासून रिसिव्ह करतो त्याप्रमाणे एक लोडर घेऊन मी गेटवर उभी राहिले. आम्ही व्हीआयपीचे पासपोर्ट आमच्या हातात घ्यायचो आणि त्यांना एक वेटिंग रूम मध्ये बसवून त्यांचा बोर्डिंग कार्ड त्यांचे इमिग्रेशन फॉर्म भरून त्यांच्या हातात द्यायचं. परंतु रतन टाटा साहेबांच्या बाबतीत हे असं कधीच घडायचं नाही. त्यांनी कधी त्यांचा पासपोर्ट आमच्याकडे दिला नाही किंवा कधी आम्हाला त्यांचा इमिग्रेशन फॉर्म भरून बोर्डिंग कार्ड काढून आणायला सांगितलं नाही. ते स्वतः काउंटरला उभे राहत असत.

काउंटर वरच्या स्टाफला भयंकर दडपण यायचं कारण स्वतः टाटा साहेब समोर उभे आहेत हे बघून ते घाबरून गेलेले असायचे आणि त्यातच ते बोर्डिंग कार्ड लवकर निघायचं नाही परंतु रतन टाटा त्या स्टाफला खूप धीर देत म्हणायचे "डोन्ट वरी, टेक युअर टाईम" आणि ते थांबून स्वतःच बोर्डिंग कार्ड स्वतःच्या हातात घेत असत.इमिग्रेशन ऑफिसरला मी पळत पळत जाऊन सांगायचे की टाटा साहेब येत आहेत. पण टाटा साहेब नेहमीसारखे इमिग्रेशनच्या लाईन मध्ये उभे राहत. सीन असा होता. इमिग्रेशन ऑफिसर उभे राहून त्यांना पुढे बोलवत होते परंतु टाटा साहेब पुढे यायला तयार नव्हते आणि पॅसेंजरने मागे वळून पाहिले तेंव्हा त्यांना दिसले टाटा साहेब लाईन मध्ये उभे आहेत. पण लोकांचा रिस्पेक्ट बघा किती की कोणीही पुढे जायला तयार नव्हतं ते सगळे टाटा साहेबांना पुढे जायला विनंती करीत होते. नाइलाजाने टाटा साहेबांना पुढे जाऊन आपले इमिग्रेशन क्लिअर करावे लागत असे. असं नेहमीच घडत असे. असंच एक दिवशी माझी नाईट ड्युटी होती आणि रतन टाटा साहेब ट्रॅव्हल करत होते. नेहमीसारख्या सगळ्या फॉर्मालिटीज पूर्ण झाल्यानंतर मी त्यांना बोर्डिंग साठी घेऊन जात होते. चालता चालता ते म्हणाले," यु आर सो एनर्जेटिक, आय वॉन्ट टू गिव्ह यु वन नोट". मी त्यांना बोर्ड केलं आणि विचार करत राहिले की मला ते ॲप्रिसिएशन लेटर देणार आहेत वाटतं. नाईट करून दोन दिवसाचा ऑफ होता म्हणून मी सातारला गेले परंतु नेमकं दोन दिवसांनी ते येणार होते. त्यावेळी त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोणी सीनियर स्टाफ नव्हता.

मला वरिष्ठ अधिकारी यांचा फोन आला की टाटा साहेब या या फ्लाईटने येत आहेत आणि तुम्ही त्यांना हॅंडल करायचे आहे. तेंव्हा मी नेमकी सातारला होते आणि मला पुन्हा मुंबईला यावं लागलं आणि मी जेंव्हा परत आले तेंव्हा त्यांना हॅंडल केलं, अरायव्हल हॉल मध्ये आम्ही आलो आणि बॅग येई पर्यंत आम्ही बोलत उभे असताना त्यांना आठवलं आणि ते म्हणाले," येस आय वॉन्ट टू गिव्ह यु वन नोट. यु हॅव पेपर ?आणि असं म्हणत त्यांनी त्यांच्या खिशामध्ये हात घालून शंभर रुपयांची नोट काढली. ती अरायव्हल हॉल मधील एका खांबावर धरली आणि त्याच्यावर माझं नाव लिहून खाली सही केली आणि मला दिली. आणि हेच माझ्यासाठी खूप मोठं गिफ्ट होतं. (मी ती नोट लॅमिनेट करून ठेवलेली आहे) ते आपली बॅग येईपर्यंत बॅगेज बेल्ट च्या तिथे उभे राहत असत. कस्टम्स विभागाचे ऑफिसर त्यांना विनंती करत असत की तुम्ही केबिनमध्ये येऊन बसा. परंतु टाटा साहेब कधीच कस्टम्स ऑफिसरच्या केबिनमध्ये जाऊन बसलेले मी तरी पाहिलेले नाहीत. ते आपली बॅग येईपर्यंत ट्रॉलीला हात लावून उभे राहत असत त्यांचा स्वीय सहाय्यक मिस्टर जो प्रोटोकॉल होता तो कायम त्यांच्या एअरपोर्टच्या ड्युटीज करीत असे. टाटा साहेब आपली बॅग क्लिअर न करता कधीच एअरपोर्टच्या बाहेर गेले नाहीत. मी पाहिलेले आहेत की खूप सेलिब्रिटीज त्यांच्या पी एस ला सांगून जातात आणि स्वतः एकटे निघून जातात. आपली बॅग येईपर्यंत टाटा साहेब पॅसेंजर साठी जे बेंचेस आहेत त्यावर बसायचे आणि ते बसलेले बघून खूप लोडर्स किंवा ड्युटी फ्री मधील कर्मचारी मला रिक्वेस्ट करायचे की टाटा साहेबां बरोबर एक फोटो काढायचा आहे. मी टाटा साहेबांना सांगायचे आणि टाटा साहेब कधीच कोणाला फोटो काढण्यासाठी नाही म्हणालेले नाहीत, मग तो लोडर असो, स्लीपर असो ड्युटी फ्री मधले कर्मचारी असो. कधीच त्यांनी नाही म्हटलेले नाही . इतक्या उत्तुंग शिखरावरचा माणूस इतका साधा कसा असू शकतो याचेच आश्चर्य वाटतं. मी एअर इंडिया मधून रिटायर झाले आणि एअरपोर्टवरच क्रिस्टल एव्हिएशन मध्ये काम करू लागले. तिथेही मला व्हीआयपी हॅंडल करायची ड्युटी असायची त्यामुळे माझा वावर एअरपोर्टवर कधी आरायव्हल हॉलमध्ये कधी डिपार्चर ला असायचा. रतन टाटा साहेब मला नावाने ओळखायचे आणि मी अरायव्हल हॉलमध्ये असतांना ते आले. मी एअर इंडिया मधून निवृत्त झाल्यामुळे युनिफॉर्म मध्ये नव्हते आणि टाटांचे माझ्याकडे लक्ष गेले आणि ते मला म्हणाले oh you are not in uniform Today, I could not recognise you . मी म्हणाले नो युनिफॉर्म because I m retired sir. आणि ते स्माईल करून म्हणाले आय एम ऑल्सो रिटायर्ड लाईक यू. . रतन टाटा साहेबांकडून खूप काही शिकायला मिळाले. कितीही मोठे झालो तरी जमिनीवर पाय कसे ठेवायचे ते त्यांच्याकडून शिकायला मिळालं. रतन टाटा यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन !

**सौ. मीना नाईक**
**बोरीवली (मुंबई)**

**(लेखिका या एअर इंडियामधील सेवानिवृत्त अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)**

# विधानसभा निवडणूक 2024
## टपाली मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज....

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. राज्यात एका टप्प्यात येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्याची निवडणूक यंत्रणा कार्यवाही करत आहे. राष्ट्रीय कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचारी, सैन्यदलातील अधिकारी, दिव्यांग तसेच ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक यांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी, पोलीस, सैन्य दलातील अधिकारी कर्मचाऱ्यांना टपाली मतदानाची सोय देण्यात येते. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी २ लाख ६७ हजार २५० टपाली मतदान झाले होते. विधानसभा निवडणुकांसाठी नियुक्त अधिकारी/ कर्मचारी यांना टपाली मतदान करता यावे यासाठी निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे.

निवडणूक कामासाठी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेव्दारे (postal ballot Paper) मतदान करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रपत्र '१२' किंवा '१२ अ' मध्ये अर्ज करणे आवश्यक आहे.तर संबधित निवडणूक अधिकारी यांच्याकडून पडताळणी करून मतदाराला टपाली मतपत्रिका देण्यात येते. प्रपत्र १२ मध्ये अर्ज केलेल्या निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त कर्मचाऱ्याने मतदानाकरिता उभारण्यात आलेल्या सुविधा केंद्रामध्ये मतदान करणे आवश्यक आहे.तर १२ 'ड' हा ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी उपलब्ध करून दिला जातो.

निवडणूक कामासाठी नेमलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची व सुरक्षेसाठी तैनात अधिकारी यांची संपूर्ण माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून तयार करण्यात येते. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशासोबत संबंधित कर्मचाऱ्यांची आगाऊरित्या माहिती भरलेले (pre-filled) प्रपत्र -१२ व १२-'अ' संबंधित निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येतात.

पोस्टाद्वारे मतदानाचा हक्क बजाऊ इच्छिणाऱ्या मतदान कर्मचाऱ्यांनी प्रपत्र-१२ मध्ये आपला मतदान करण्यासाठी असलेला अर्ज संबंधित समन्वय अधिकाऱ्यामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे, मतदानाच्या तारखेच्या आधी किमान ०७ दिवसांपर्यंत सादर करावा असा नियम आहे. निवडणूक कर्मचाऱ्यांच्या पहिल्या प्रशिक्षणाच्या वेळी कर्मचाऱ्यांनी संपूर्ण माहिती भरुन सही केलेले प्रपत्र-१२ जमा करुन घेण्यात येते. कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण ते उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रपत्र-१२ तसेच १२ 'अ' चे वितरण व संबंधित कर्मचाऱ्यांकडून भरण्यात आलेल्या प्रपत्रांची माहिती संकलित करण्यात येत असते.

कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेले प्रपत्र-१२ विधानसभा मतदारसंघनिहाय वेगवेगळे करणे व स्वतंत्र पाकिटांमध्ये त्या त्या मतदारसंघाचे नाव व जिल्ह्याचे नाव लिहून त्यामध्ये ठेवणे, प्राप्त झालेले 'प्रपत्र-१२' स्कॅन करुन त्या सोबतच्या प्रपत्र-४ मधील यादीसह त्या - त्या मतदारसंघांच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नेमलेल्या समन्वय अधिकारी यांच्याकडे पाठविले जातात.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाल्यानंतर पुढील ७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी पडताळणी केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतपत्रिका, निवडणूक कर्तव्यार्थ प्रमाणपत्र व त्या सोबतचे आवश्यक प्रपत्र व लिफाफे तयार करणे व संबंधित कर्मचाऱ्यांबाबत मतदार यादीमध्ये (Marked copy) आवश्यक नोंद घेणे आवश्यक असेल.

जिल्हा समन्वय केंद्रास दिलेल्या पहिल्या भेटी वेळी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाल्यानंतर चौथ्या दिवशी दि.८ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा समन्वय केंद्रात (District Clearing Centre) अन्य जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाकरिताच्या टपाली मतपत्रिका जिल्हा समन्वय अधिकाऱ्याकडे देण्यात येईल. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाल्यानंतर पाचव्या दिवशी दि.९ नोव्हेंबर २०२४ सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा समन्वय अधिकारी यांनी राज्य स्तरावरील समन्वयन केंद्रामधील (State Clearing Centre) एकत्र येऊन त्यांच्या जिल्ह्यातील विधानसभानिहाय टपाली मतपत्रिका तसेच त्या सोबतच्या आवश्यक प्रपत्र व लिफाफ्यांची देवाणघेवाण अन्य जिल्ह्यातील समन्वय अधिकाऱ्यांबरोबर केली जाते. पुन्हा त्यांच्या जिल्ह्याकडे पुरेशा सुरक्षा व्यवस्थेसह रवाना केली जाईल.

निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या दुसऱ्या प्रशिक्षणाच्या वेळी (दि. १० नोव्हेंबर २०२४ ते १४ नोव्हेंबर २०२४या कालावधीत) सर्व विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी हे कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण केंद्रावरील मतदान सुविधा केंद्रामध्ये (Facilitation Centre) संबंधित कर्मचाऱ्यांकडून टपाली मतपत्रिकांवर मतदान करुन घेण्यात येते. मतदान संपल्यानंतर सुविधा केंद्रामध्ये सर्व मतदारांनी (निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त कर्मचारी) मतदान केल्यानंतर सुविधा केंद्राच्या प्रमुखाने राजकीय पक्ष अथवा उमेदवार यांच्या उपस्थितीत मतपेट्यांमधील टपाली मतपत्रिका असलेले लिफाफे बाहेर काढून संबंधित विधानसभानिहाय त्याची विभागणी करून ते स्ट्रॉंगरुममध्ये ठेवतील त्यानंतर मतदानाच्या पाच दिवस आधी म्हणजे दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा समन्वय केंद्रात (District Clearing Centre) संबंधित जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या समन्वय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत टपाली मतपत्रिका व उशीरा प्राप्त झालेल्या प्रपत्र-१२ असलेले स्वतंत्र लिफाफे/बॅग हे त्या त्या जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय किंवा अन्य जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाकरिता मतदान करण्यात आलेल्या मतपत्रिकांचे लिफाफे संबंधित जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांकडे सुर्पूद करतील. त्यानंतर मतदानाच्या चार दिवस आधी १६ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य समन्वय केंद्रात सर्व जिल्ह्यांचे जिल्हा समन्वय अधिकारी टपाली मतदान पत्रिका व उशीरा प्राप्त झालेल्या प्रपत्र-१२ यांचे आदानप्रदान करून व पुन्हा त्यांच्या जिल्ह्याकडे रवाना होतील.

मतदानाच्या तीन दिवस ते एक दिवस आधीपर्यंतचा कालावधी ( १७ नोव्हेंबर २०२४ते १९ नोव्हेंबर २०२४) सर्व विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी यांच्या मार्फत मतदान कर्मचाऱ्यांचे तिसऱ्या प्रशिक्षणानंतर राज्य समन्वय केंद्राला दिलेल्या दुस-या भेटी वेळी त्या त्या दिवशी प्रशिक्षण केंद्रावरील मतदान सुविधा केंद्रामध्ये (Facilitation Centre) संबंधित कर्मचाऱ्यांकडून टपाली मतपत्रिकांवर मतदान करुन घेतली जाते व दुसऱ्या प्रशिक्षणानंतर मतदान केलेल्या टपाली मतपत्रिकांच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही पूर्ण होईल. राज्य समन्वय केंद्राला दिलेल्या तिसऱ्या भेटीत मतदानाच्या दुसऱ्या दिवशी सर्व विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी व जिल्हा समन्वय अधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील विधानसभा समन्वय अधिकाऱ्यांकडून टपाली मतपत्रिका जमा करुन घेतील व त्या राज्य समन्वय केंद्रामध्ये घेऊन जाणे व तेथे अन्य जिल्ह्यांच्या समन्वय अधिकाऱ्यांशी टपाली मतपत्रिकांचे लिफाफे व बॅग यांचे आदानप्रदान करण्याची कार्यवाही होते.

प्रत्येकाचे मत मोलाचे आहे राज्याची निवडणूक यंत्रणा हे जाणून कोणत्याही क्षेत्रातील मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी ही कार्यवाही करत आहे. तरी लोकशाहीच्या उत्सवातील आपल्या कर्तव्य व जबाबदाऱ्या निभावताना कामासोबत मतदान करण्याचीही जबाबदारी पार पाडण्यासाठी ज्यांना टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध आहे त्यांनी जरूर मतदान करावे.

**संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय

# जागतिक पोलिओ दिन

आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले.

१९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब,उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.

**- श्याम ठाणेदार**
पुणे

## हळदी कुंकू कार्यक्रमाआडून महिलांना भेटवस्तू वाटप; आचारसंहितेचा भंग?

**मीरारोड :** मीरारोड मधील एका गृहसंकुलात माजी भाजपा आमदार नरेंद्र मेहता याना मतं द्या असं आवाहन माजी नगरसेवकांनी केले. त्यानंतर उपस्थित महिलांना भेट वस्तू देण्यात आल्याचा प्रकार व्हिडिओ व फोटो समोर आल्याने विरोधकांकडून कारवाईची मागणी होत आहे . विधानसभा निवडणुकीत सध्या कोणत्यातरी कार्यक्रमाच्या आड भेटवस्तू देणे वा भेट वस्तूसाठी टोकन देऊन ती भेट परिसरातील कार्यकर्त्या मार्फत पोहचवणे आदी प्रकार सुरू आहेत. त्यातच मंगळवार २२ ऑक्टोबर रोजी मीरारोडच्या पूनम सागर कॉम्प्लेक्स मध्ये नवग्रह संकुलाच्या आवारात महिलांचा कार्यक्रम होता . यावेळी मेहता यांचे समर्थक भाजपाचे माजी नगरसेवक अनिल विराणी , मनोज दुबे , सीमा शाह , रेखा विराणी आदींसह भाजपा कार्यकर्त्या या कार्यक्रमास आले होते . यावेळी कार्यक्रमात माजी नगरसेवकांनी नरेंद्र मेहता यांना मतदान करण्याचे आवाहन केले . त्या नंतर जमलेल्या महिलांना विविध प्रकारच्या गृहोपयोगी वस्तूंची भेट देण्यात आली . सदर कार्यक्रमाचे व्हिडीओ आणि छायाचित्रे व्हायरल झाले आहेत .



## महत्त्वाचे

### 144-कल्याण ग्रामीण मतदार संघासाठी टोल-फ्री क्रमांक जाहीर

**कल्याण :** सार्वत्रिक विधानसभा निवडणूक - 2024 च्या अनुषंगाने, 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघासाठी नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक 1800-233-1750 तसेच दूरध्वनी क्रमांक 0251-2970014 कार्यान्वित करण्यात आला असून, 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाशी निगडीत कामकाजासाठी या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन 144-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी केले आहे.

### जमिनीच्या वादातून इस्टेट एजंटची हत्या

**अंबरनाथ :** अंबरनाथमध्ये मंगळवारी रात्रीच्या सुमारास एका इस्टेट एजंटची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणाचा पोलिसांनी अवघ्या काही तासातच उलघडा करत दोन संशयित आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. जमिनीच्या वादातून ही हत्या करण्यात आल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. जुन्या अंबरनाथ गावात राहणारे संजय पाटील यांनी १९ वर्षांपूर्वी अंबरनाथ एमआयडीसीत जमीन खरेदी केली होती. मात्र ही जमीन मूळ मालकाने पुन्हा दुसऱ्या व्यक्तीला विकली होती. यावरून संजय पाटील यांचे जमीन मालकाशी वाद सुरू होते. दरम्यान मंगळवारी रात्री संजय पाटील हे मेफ्लॉवर गार्डन समोर उभे असताना मागून आलेल्या सुरज पाटील आणि हर्ष पाटील या दोघांनी अचानकपणे त्यांच्यावर धारदार शस्त्राने तब्बल २५ वार केले. यातील दोन घाव वर्मी बसल्याने संजय पाटील यांचा जागीच मृत्यू झाला होता. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तातडीने तपास सुरु केला. यानंतर पोलीस तपासात अवघ्या काही तासातच सुरज पाटील आणि हर्ष पाटील या दोघांना भिवंडीतून बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्या चौकशीत जमिनीच्या वादातून आपणच ही हत्या केल्याची दोघांनी कबुली दिली. त्यानुसार दोघांना पोलिसांनी अटक करत न्यायालयात हजर केल्याची माहिती पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली आहे.

### बदलापुरात शिंदे सेनेला धक्का

**बदलापूर :** ऐन विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर बदलापुरात शिंदे सेनेला मोठा धक्का बसला आहे. उपशहरप्रमुख तेजस ऊर्फ बंटी म्हसकर यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला आहे. आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी आयोजित भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीवेळी बुधवारी (ता. २३) दुपारी हा पक्षप्रवेश पार पडला. तेजस ऊर्फ बंटी म्हसकर हे बदलापूर पश्चिम वालिवली परिसरात राहतात. मागील अनेक वर्षे शिवसेनेत युवा कार्यकर्ते म्हणून काम करत होते. त्यांचे काम व त्यांचा दांडगा जनसंपर्क यामुळे पक्षातून थेट उपशहरप्रमुखपद बंटी म्हसकर यांना दिले होते; मात्र पक्षात अंतर्गत नाराजी व गटबाजी होत असल्याने अखेर बंटी म्हसकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे म्हटले जात आहे; मात्र आमदार किसन कथोरे यांच्या विकासकामांचा आलेख पाहून मी भाजपात पक्षप्रवेश केला असल्याचे बंटी म्हसकर यांनी यावेळी सांगितले.

# कळवा-मुंब्र्यात मतदारसंघात गुरु शिष्याची लढाई

## आमदार जितेंद्र आव्हाड आणि नजीब मुल्ला आमने-सामने

प्रतिनिधी
■ ठाणे

राज्यात विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं आहे. 20 नोव्हेंबरला मतदान तर 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. तर ठाण्यातील कळवा मुंब्रा मतदारसंघात गुरू शिष्याची लढाई पाहायला मिळणार आहे.



आमदार जितेंद्र आव्हाड आणि नजीब मुल्ला हे दोघेही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड आणि त्यांचे एकेकाळचे खंदे समर्थक नजीब मुल्ला यांची थेट लढत कळवा मुंब्रा मतदारसंघामध्ये होणार आहे. या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार तयारी सुरू झालीय. कळवा मुंब्रा मतदारसंघामधील ही लढाई गुरू शिष्यमध्ये असली तरी, एकेकाळी हे गुरू शिष्य एका ताटात जेवले होते. आता याच शिष्याने गुरू म्हणजे जितेंद्र आव्हाड यांना आव्हान दिलं आहे.

आमच्यात गुरु शिष्याचे नातं होतं. प्रत्येक निवडणुकीत कोण कोणासमोरही उभा राहतो. त्यामुळं यावेळेस देखील कोणीही उभं राहिलं तरी काही फरक पडत नाही. शरद पवार यांच्या उपस्थितीत फॉर्म भरून प्रचाराला सुरुवात करणार आहे.

कोपरी पाचपाखडी मतदारसंघामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे निवडणूक लढणार आहेत. तर एकनाथ शिंदे यांचे गुरू आनंद दिघे यांचे पुतणे हे उद्धव ठाकरे गटातून एकनाथ शिंदे यांच्या विरोधात लढणार आहेत. त्यामुळं ही लढाई देखील भावनिक असणार आहे. 'धर्मवीर' सिनेमामध्ये आनंद दिघे आणि त्यांचं आयुष्यभर केलेलं काम दाखवण्यात आलय. त्यामुळं त्याचा देखील फायदा केदार दिघे यांना मिळू शकतो. मात्र त्यांची लढाई सोपी नाही, कारण या मतदारसंघात एकनाथ शिंदे यांना मानणारा मोठा वर्ग आहे.

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपमुख्यमंत्री फडणवीस आणि राज ठाकरे आज कल्याण-डोंबिवलीत

प्रतिनिधी
■ कल्याण

शिवसेनेच्या शिंदे गटातील एका प्रभावी गटाने महायुतीच्या कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार सुलभा गायकवाड यांचे काम करण्यास नकार दिला आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण पूर्वेत महायुतीत बंडाचे वारे वाहत असतानाच, आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी गुरूवारी सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कल्याणमध्ये येत असल्याने शिवसेनेतील बंडाच्या तयारीत असलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांना हा सूचक इशारा मानला जात आहे.

कल्याण पूर्वेत आपण महायुतीच्या उमेदवार म्हणून सुलभा गायकवाड यांचेच काम करायचे आहे. कोणीही अपक्ष निवडणूक लढवू नये किंवा बंडखोरीचा पवित्रा घेऊ नये,



अशी तंबी शिवसेनेच्या वरिष्ठांनी स्थानिकांना दिल्याचे समजते. या तंबीनंतर बंडाच्या पवित्र्यातील काही जण शांत तर काही जण अद्याप अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी करत आहेत. सुलभा गायकवाड यांचे काम न करण्याची भूमिका शिवसेनेतील कल्याण पूर्वेतील काही माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. या पदाधिकाऱ्यांना सुलभा गायकवाड याच महायुतीच्या उमेदवार असतील आणि मोठ्या मताधिक्याने त्या निवडून येतील, असा सूचक इशारा देण्याच्या व्यूहनितीचा भाग म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याण पूर्वेत येण्याचा निर्णय घेतला आहे.

सुलभा गायकवाड गुरुवारी महायुतीच्या उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज भरतील. यावेळी शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, रिपब्लिकन, इतर घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी यावेळी उपस्थित असतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. महायुतीचा जनसागर गुरूवारी सुलभा गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज भरताना लोटलेला असेल. तुल्यबळ असा उमेदवार समोर नसल्याने त्यांचा विजय नक्की होईल,

# पालिकेतर्फे कॉलेज, डॉक्टरांवर निवडणूक जनजागृतीची जबाबदारी

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

महानगरपालिकेने उल्हासनगर विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी कंबर कसली असून त्याकरिता शहरातील 4 नामचिन कॉलेज व डॉक्टरांवर जनजागृतीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.. आयुक्त विकास ढाकणे, स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांनी स्थायी समिती सभागृहात विधानसभा निवडणूकित जनजागृतीची रूपरेषा ठरवण्यासाठी बैठक आयोजित केली होती. त्यात चांदीबाई कॉलेज, आरकेटी कॉलेज,एसएसटी कॉलेज आणि वेदांत कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यासह सहायक आयुक्त विशाल कदम, मयुरी कदम,जनसंपर्क अधिकारी



छाया डांगळे, डॉक्टर संघटनांचे प्रतिनिधी, दिव्यांग अधिकारी, समाजसेविका उपस्थित होते..या बैठकीत विकास ढाकणे, किशोर गवस यांनी सर्व सदस्यांनी निवडणुक जनजागृती निमित्ताने विविध लक्षवेधक नियोजन करून त्याप्रमाणे जास्तीत जास्त परिणामकारक उपक्रम राबवून महापालिका क्षेत्रातील मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृती करण्याचे निर्देश उपस्थितांना दिले.

# शिंदे शिवसेनेतील विशाल पावशे लढणार अपक्ष

## सुलभा गायकवाड यांना कडाडून विरोध

प्रतिनिधी
■ कल्याण

महायुतीत जागा वाटपानंतर इच्छुकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहेत. कल्याण पूर्वेत भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना भाजपने उमेदवारी दिल्यानंतर शिंदे गटातील माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी उघडपणे बंडाचा इशारा दिला होता. सुलभा गायकवाड उद्या देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व माजी नगरसेवक विशाल पावशे हे देखील येत्या 25 तारखेला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. अशातच शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख महेश गायकवाड, विधानसभा प्रमुख निलेश शिंदे हे दोन इच्छुक देखील विधानसभा निवडणुकीत उतरणार असल्याचे चर्चा आहे.

शिवसेना शिंदे गट व भाजपमधील वादामुळे कल्याण पूर्व हा मतदारसंघ कायमच चर्चेत राहिला आहे काही महिन्यांपूर्वी भाजपा आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केल्याचे घटना घडली. या घटनेनंतर शिवसेना भाजपा मधील संघर्ष चव्हाट्यावर आला. शिवसेना शिंदे गटाने कल्याण पूर्व या मतदारसंघावर दावा केला तर दुसरीकडे भाजपाने या मतदारसंघात विद्यमान आमदार गणपत गायकवाड भाजपचे आहेत त्यामुळे हा मतदारसंघ भाजपकडेच राहील असे स्पष्ट केले होते.शिवसेना शिंदे गटाकडून शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड विधानसभा प्रमुख निलेश शिंदे उपशहर प्रमुख विशाल पावशे हे विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. भाजपने आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना पहिल्याच यादीत उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील संघर्ष समोर आला आहे. शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेवक तसेच पदाधिकाऱ्यांनी बैठक घेत बंडाचा झेंडा फडकवणार असल्याचा इशारा दिला आहे.

# धावत्या लोकलमधून हात सुटून महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

अंबरनाथ स्थानकानजीक धावत्या लोकलमधून पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. ही घटना अंबरनाथ आणि बदलापूर रेल्वे स्थानकांदरम्यान घडली. याप्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आलीय. तर आधिकचा तपास रेल्वे पोलीस करत आहेत. ऋतुजा गणेश जंगम असं या महिलेचं नाव असून ती कर्जतला राहात असल्याची प्राथमिक माहिती, रेल्वे पोलिसांनी दिलीय.

मृत ऋतुजा जंगम कर्जत शहरात कुटुंबासह राहत होती. ती ठाण्याला एका खासगी ट्रॅव्हल्स कंपनीत कामाला होती. नेहमीप्रमाणे २२ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास ठाण्याहून कर्जत लोकलनं घरी परतताना, अंबरनाथ रेल्वे स्थानकात गर्दीमुळं ती लोकलमधून खाली उतरून पुन्हा लोकलमध्ये चढली. पण यावेळी तिला गर्दीमुळं बोगीच्या आत जाताच आलं नाही आणि ती दारात उभी राहिली. परंतु, गर्दी जास्त असल्यानं ऋतुजाचा हात सुटला आणि ती लोकलमधून खाली पडली. अंबरनाथ स्थानकातून सायंकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी कर्जत लोकल सुटते. पण मंगळवारी ही लोकल सुमारे २५ ते ३० मिनिटे उशिरानं धावली.

# 27 गाव सर्वपक्षीय हक्क संघर्ष समिती अध्यक्षपदी खासदार सुरेश म्हात्रे यांची एकमताने निवड

प्रतिनिधी
■ डोंबिवली

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील 27 गाव सर्व पक्षीय हक्क संघर्ष समितीत उभी फूट पडल्याचे पहायला मिळत आहे. तत्कालीन अध्यक्ष गंगाराम शेलार आणि शिवसेना शिंदे गटाचे उपाध्यक्ष गुलाब वझे यांनी संघटनेच्या सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी पद्धतीने पदाधिकाऱ्यांची नेमणूक केली. याविषयी समितीतील सदस्यांनी नाराजी व्यक्त केली असून खासदार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांची नव्याने अध्यक्षपदी निवड केली आहे. असे सरचिटणीस पदी चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

27 गावांची स्वतंत्र नगरपालिका



यांसह अनेक समस्या सुटाव्यात याकरता आपण शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुरेश म्हात्रे यांनी सांगितले.

बुधवारी दुपारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते डॉ. वंडार पाटील यांच्या कार्यालयात सर्व पक्षीय संघर्ष समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्रित जमून भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांची कल्याण ग्रामीण मधील 27 गाव सर्व पक्षीय संघर्ष समितीचे अध्यक्ष पदी एकमताने निवड केली. त्यामुळे महायुतीला महाविकास आघाडीकडून जोरदार झटका दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यावेळी वंडार पाटील, सत्यवान म्हात्रे, विजय भाने, रामदास काळण, दत्ता वझे, तुळशीराम काळण, वासुदेव संते, वासुदेव गायकर, शरद म्हात्रे, राम पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते..

# पक्षीय कार्यालयांसमोरील पदाधिकाऱ्यांच्या वाहनांमुळे कल्याण-डोंबिवली शहरात वाहन कोंडी

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण डोंबिवली शहराच्या विविध भागात विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपली जनसंपर्क, निवडणूक कार्यालये सुरू केली आहेत. अनेक ठिकाणी पक्षीय कार्यालये हीच निवडणूक कार्यालये करण्यात आली आहेत. या कार्यालयांच्या बाहेर दररोज सकाळ, संध्याकाळ पक्षीय नेते, पदाधिकारी सार्वजनिक रस्त्यावरील वाहनांचा



विचार न करता कार्यालयासमोरील रस्त्यावर आडवी तिडवी वाहने उभी करत असल्याने शहरातील वाहतूक कोंडीत भर पडली आहे.

निवडणूक कार्यालयात आलेल्या नेते, पदाधिकाऱ्याला वाहन बाजुला करून घ्या, असे सांगण्यास जाणाऱ्या वाहतूक पोलिसाला उलटसुलट उत्तरे मिळण्याची शक्यता असल्याने ते आव्हान न स्वीकारता वाहतूक पोलीस, सेवक आहे त्या परिस्थितीत पक्षीय कार्यालयांसमोरील कोंडी सोडविण्याचा प्रयत्न करत आहेत. डोंबिवली पूर्वेत सर्वाधिक वर्दळीच्या मानपाडा रस्त्यावर मंगळवारी संध्याकाळी एका पक्षीय कार्यालयात नेते, पदाधिकाऱ्यांची बैठक होती.

# मुख्यमंत्री शिंदे 28 ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज करणार दाखल - खासदार नरेश म्हस्के

प्रतिनिधी
■ ठाणे

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी मुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दि. २४ ऑक्टोबर २०२४ ऐवजी सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी भरणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १४७ कोपरी पांचपाखाडी विधानसभा मतदार संघासाठी मुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दि.२४ ऑक्टोबर २०२४ रोजी भरण्याचे निश्चित करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्रातील शिवसेना महायुतीच्या उमेदवारांचे उमेदवारी अर्ज संबंधित विधानसभा क्षेत्रात भरावयाचे असल्याने दि.२४ ऑक्टोबर २०२४ रोजीचा दिवस रद्द करण्यात आला असून, सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता मा. एकनाथ संभाजी शिंदे यांचा उमेदवारी अर्ज भरणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.

# मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने अंबरनाथचा तिढा सुटला

## आमदार डॉ. किणीकर आणि वाळेकर यांच्यात समेट

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

अंबरनाथ विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या दोन गटांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीने समेट घडवण्यात आली आहे. विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर आणि शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष अरविंद वाळेकर यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष होता. विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांमध्ये हा संघर्ष तीव्र झाला होता. त्यामुळे ही जागा धोक्यात आल्याची चर्चा होती. अखेर मुख्यमंत्री



एकनाथ यांनी दोन्ही गटांना बोलवून चर्चा केली आहे. त्यामुळे अंबरनाथ विधानसभेचा तिढा सुटल्याचे बोलले जाते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून परिचित असलेले अंबरनाथ विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार डॉ. बालाजी किणीकर चौथ्यांदा विधानसभेच्या रिंगणात उतरत आहेत. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील अंबरनाथ ही एकमेव विधानसभा आहे जी शिवसेनेच्या ताब्यात आहे. त्यामुळे ही जागा राखणे शिवसेनेसाठी महत्त्वाचे आहे. मात्र स्थानिक पातळीवर अंबरनाथ शहराचे माजी नगराध्यक्ष अरविंद वाळेकर आणि विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्यामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष आहे.

# आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची ऐरोली विधानसभा निवडणूक कार्यालयास भेट

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक 20 नोव्हेंबर 2024 रोजी होत असून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 150 ऐरोली व 151 बेलापूर या दोन विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा व या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढावी यादृष्टीने विविध माध्यमांतून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या दोन्ही मतदार संघातील मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये याची विशेष काळजी घेतली जात आहे.

या अनुषंगाने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी 150 ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या कार्यालयाला भेट देत तेथील सुविधा कक्षांची पाहणी केली. त्याचप्रमाणे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्रीम.सुचिता भिकाने यांच्याशी चर्चा करुन




निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रांवरील सुविधा तसेच इतर पूरक बाबींच्या पूर्ततेच्या व्यवस्थेत नवी मुंबई महानगरपालिका संपूर्ण सहकार्य करेल असे आयुक्तांनी सांगितले.

ऐरोली विधानसभा मतदार संघात 79 ठिकाणी 447 मतदान केंद्रे असून तेथे स्वच्छतागृह सुविधा तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुरेशा प्रमाणात करावी असे आयुक्तांनी शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड यांना सूचित केले. घणसोली येथील नवी मुंबई सिटी स्कुलमध्ये सर्वाधिक मतदान केंद्रे असल्याने त्याठिकाणी भेट देत आयुक्तांनी पाहणी केली व नागरिकांची वाहने पार्किंग व्यवस्था, रॅम्प, पिण्याचे शुध्द पाणी, व्हिलचेअर, रांगेमध्ये बसण्याची व सावलीची व्यवस्था तसेच इतर सुविधांची पूर्तता करताना अधिक काळजी घेण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. अशाच प्रकारच्या सुविधा इतरही मतदानकेंद्रावर पुरविल्या जातील याची दक्षता घेण्याचे त्यांनी निर्देशित केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत ऐरोली व बेलापूर या दोन्ही मतदारसंघात आवश्यक सुविधा पूर्तीकरिता संपूर्ण सहकार्य करण्यात येत असून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करून घ्यावी व 20 नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# शाळा, मार्केट, उद्याने अशा विविध ठिकाणी मतदान करण्याविषयी जनजागृती

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

विधानसभा निवडणूकीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत असून निवडणूक कार्यालयांच्या स्वीप पथकांप्रमाणेच महानगरपालिकेच्या विभाग कार्यालय स्तरावरील पथकांमार्फतही विविध समाज घटकांपर्यंत पोहचून 20 नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

नेरूळ विभागातील सेक्टर 25 जुईनगर येथील चिंचोली उद्यानात ज्येष्ठ नागरिक तसेच मॉर्नींग वॉकला येणा-या नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहचविण्यात आला. त्यातही विशेषत्वाने युवक व नवमतदारांपर्यंत पोहचून त्यांना मतदानाचे लोकशाहीतील महत्व विशद करीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. नेरूळ सेक्टर 8 येथील एल




मार्केट परिसरात व्यावसायिक व ग्राहक यांच्यामध्येही मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. रामलीला मैदानात श्री ॲकेडमीमधील प्रशिक्षणार्थी युवक – युवतींमध्ये लोकशाहीच्या सबलीकरणासाठी मतदानाचे महत्व याविषयी जाणीव जागृती करण्यात आली व त्यांनी मतदानाचा अधिकार कर्तव्यभावनेने बजावण्याविषयी सूचित करण्यात आले. सेक्टर 1 शिरवणे येथील महिला मंडळात जाऊनही मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले. सर्वच ठिकाणी मतदानाची प्रतिज्ञा घेण्यात आली व प्रतिज्ञेचे पालन करण्याविषयी सांगण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्व प्रसारित व्हावे व त्यांच्या माध्यमातून त्यांच्या पालक व परिचितांपर्यंत मतदान करण्याविषयीचा संदेश आणि आवाहन पोहचावे यादृष्टीने नमुंमपा शिक्षण विभागाच्या वतीने महानगरपालिकेच्या तसेच खाजगी शाळांना विविध उपक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

## 'लाडकी बहीण'ला विरोध करणाऱ्या वडपल्लीवार यांच्या जीवाला धोका

नागपूर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या विरोधात नागपूर उच्चन्यायालयात याचिका दाखल करणारे याचिकाकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी आपल्या जीवाला धोका असल्याने पोलिस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी करणारी याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने वडपल्लीवार यांच्या अर्जावर नियमाप्रमाणे तातडीने कारवाई करण्याचे निर्देश पोलिस आयुक्तांना दिले आहे. मी महिनाभरापूर्वी जीवाला धोका असल्याने पोलिस संरक्षण देण्याची मागणी करणारा अर्ज पोलिस आयुक्तांकडे केला होता. मात्र पोलिस आयुक्तालयाकडून त्यावर काहीच कार्यवाही न करण्यात आल्याने उच्चन्यायालयात धाव घेतली. त्यावर उच्चन्यायालयाने उपरोक्त निर्देश दिले. राज्यात निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वीच नागपूरमधील सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी लाडकी बहिण योजनेच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. राज्याची आर्थिक स्थिती बिकट असताना लाडकी बहिणसारख्या योजनेच्या माध्यमातून राज्य शासन मोफत पैसे का वाटत आहे, असा सवाल उपस्थित करत वडपल्लीवार यांनी अशा योजना बंद करण्याची मागणी न्यायालयात केली. न्यायालयात याचिका दाखल झाल्यावर राज्यातील राजकीय नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली होती.

# संभाजी ब्रिगेडचा ठाकरेंना 'दे धक्का', युती तोडली

## विधानसभेला 50 मतदारसंघात उमेदवार देणार

प्रतिनिधी

■ पुणे

राज्यातील विधानसभा निवडणुकीबाबत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्यावतीने संभाजी ब्रिगेडला विश्वासात घेतले नाही, त्यामुळे ही युती आता तुटली असून राज्यात संभाजी ब्रिगेड स्वबळावर लढणार आहे. तसेच राज्यात 50 पेक्षा अधिक उमेदवार देणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ.शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी दिली आहे. संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष मनोज आखरे, महासचिव सौरभ खेडेकर, गंगाधर बनबरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकी संभाजी ब्रिगेड राज्यातील 50 हून अधिक





मतदारसंघात उमेदवार देत ही लढत अधिक चुरशीची करण्याच्या तयारीत आहे.

दोन वर्षापूर्वी शिवसेनेबरोबर संभाजी ब्रिगेडची युती झाली होती. लोकसभा निवडणुकीत एकही जागा न घेता संभाजी ब्रिगेडने शिवसेना (उबाठा) महाविकास आघाडीचा प्रचार केला. दरम्यान, महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानसभेला संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान चार ते पाच जागा देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु विधानसभेच्या जागा वाटपात आम्हाला सन्मानपूर्वक स्थान आणि आश्वासनानुसार जागा न दिल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते डॉ. शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

शिवसेना (उबाठा) बरोबरची युती तोडून महाविकास आघाडीतून आम्ही बाहेर पडत आहोत. जात, धर्म, फॅसिस्ट शक्तींना संभाजी ब्रिगेडचा नेहमीच विरोध राहिला असून तो कायम राहील. संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी आम्ही लोकांचे प्रश्न, महामानवांचे विचार घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहोत. सुमारे 50 जागावर आमचे उमेदवार अर्ज भरणार आहेत. महायुतीची सनातन विषमता आणि आघाडीचे नकली पुरोगामीत्व या विरोधात समाजमत तयार करण्याची गरज असल्याचेही डॉ.शिवानंद भानुसे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

संभाजी ब्रिगेडच्या एका शिष्टमंडळाने काही दिवसांपुर्वी मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचा लढा उभारणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून संभाजी ब्रिगेड मनोज जरांगें यांच्यबरोबर जाणार आहेत. मराठा क्रांती मोर्चाकडून आता नेमकं कोणाला उमेदवार म्हणून जाहीर केलं जाईल हे पाहणंही महत्त्वाचं असणार आहे.


# इम्तियाज जलील फडणवीसांचे बाहुले

## एआयएमआयएमचे कार्याध्यक्ष डॉ. कादर यांनी राजीनामा देत केली स्पष्टोक्ती

प्रतिनिधी

■ संभाजीनगर

ऑल इंडिया मजलिस इत्तेहादुल मुस्लिमीनचे (एआयएमआयएम) महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे नेते डॉ. अब्दुल गफ्फार कादर यांनी कार्याध्यक्ष पदाचा राजीनामा पक्षाचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्याकडे पाठवला आहे. डॉ. कादरी यांनी ईमेलच्या माध्यमातून राजीनामा पाठवला आहे. त्यानंतर त्यांनी पक्षाचे महाराष्ट्रातील नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या इशाऱ्यावर जलील काम करतात. ते फडणवीसांचे बाहुले झालेले आहेत. त्यांनी नांदेड लोकसभेतून निवडणूक लढवण्याऐवजी देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात निवडणूक लढवून दाखवावी, असे आव्हान त्यांनी दिले आहे. वंचित बहुजन आघाडीसोबतची





युती जलील यांच्यामुळेच तुटली असाही आरोप डॉ. कादरी यांनी केला.

डॉ. अब्दुल गफ्फार कादरी यांनी 2014, 2019 विधानसभा निवडणूक औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून लढवली होती. यंदाही ते याच मतदारसंघातून इच्छूक आहेत. एमआयएमचा राजीनामा दिल्यानंतर ते काँग्रेस नेत्यांच्या संपर्कात आहेत. डॉ. कादरी यांनी पत्रकार परिषद घेऊन राजीनाम्याची घोषणा केली. यावेळी ते म्हणाले की, इम्तियाज जलील यांनी पक्षाचे नेते ओवैसी यांच्याकडे माझ्याविरोधात कान भरले. त्यामुळे ते एक मिनिटही माझ्यासोबत बोलायला तयार नाहीत. जलील यांनी माझ्याविरोधात डाव रचला. पक्षाची महाराष्ट्रात वाढ होणार नाही असेच काम त्यांनी केले. पक्षाला कमकुवत करण्याचे काम ते करत राहिले. 2019 मध्ये समाजवादी पक्षासोबत त्यांनी युती केली आणि काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या बड्या नेत्यांना पाडण्याचेच फक्त काम एमआयएमच्या उमेदवारांनी केले. यासाठी त्यांनी नसीम खान यांचे उदाहरण दिले.


# निवडणूक जिंकलो नाही, तर फाशी घेईन

प्रतिनिधी

■ सांगोला

तुम्ही सात-आठ सभा घ्याव्यात. पण मी विजयाचा गुलाल उधळला नाही, तर फास घेऊन मरेन, असे आव्हान सांगोल्याचे आमदार आणि काय झाडी, काय हॉटेल फेम शहाजी बापू पाटील यांनी संजय राऊत यांना दिले आहे. तसेच शहाजी पाटील यांनी पुण्यात सापडलेल्या पैशांवरुन रोहित पवारांवरही निशाणा साधला. पुण्यातील सापडलेले पैसे मोजायला रोहित पवार गेले होते का? असा सवाल शहाजी बापू पाटील यांनी केला.

एकनाथ शिंदे गटाने मंगळवारी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत सर्व विद्यमान



आमदारांना पुन्हा तिकीट दिले आहे. शहाजी बापू पाटील यांना पुन्हा सांगोल्यातून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यासर रोहित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला.

संजय राऊत हा सकाळी 9 वाजता महाराष्ट्रात भुंकणारा कुत्रा आहे. अशा कुत्र्यांकडे मी लक्ष देत नसतो. माझ्याविरोधात संजय राऊत, त्याचा बाप, आजा यांनी एक नाही तर दहा सभा घेऊ देत...मी त्याला पालथा पाडून तुडवून पुढे जाऊन दाखवेन, असे शहाजी पाटील म्हणाले. संजय राऊतांनी सात-आठ सभा घेऊ द्या, मी विजयाचा गुलाल उधळला नाही, तर फास घेऊन मरेन, असे एकप्रकारे थेट आव्हान शहाजीबापूंनी संजय राऊतांना दिले. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याकडे महाराष्ट्राविषयी कोणतेही व्हिजन नाही. अडीच वर्षांतील त्यांचे एक काम दाखवा, मी एकनाथ शिंदे यांची हजार कामे दाखवू, अशा शब्दांत त्यांनी ठाकरे गटावर टीका केली. पुणे शहरात सापडलेले पैसे उद्योगपती रफिक शेख यांचे होते. त्यांनी ते कबूलही केले आहे. ते पैसे त्यांचे असल्याची जबाबदारी रफिक शेख यांनी घेतली आहे.

## दिविजा वृद्धाश्रमातून विद्यार्थ्यांना मोफत उटणे

■ कणकवली

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असलदे (तालुका कणकवली) येथील स्वस्तिक फाऊंडेशन संचलित दिविजा वृद्धाश्रमातील आजी आजोबांनी आपल्या शालेय नातवंडांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी पारंपारिक उटणे स्वतः बनवून विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आले. दिविजा वृद्धाश्रमाचे संचालक संदेश शेट्ये यांनी आजी आजोबांचे हे शुभ आशीर्वाद कणकवली तालुक्यातील सुमारे 12 हजार विद्यार्थ्यांपर्यंत उटण्याच्या रुपात पोहोच केले. आज कालच्या तरुण पिढीला उटणे, कारटी, पणत्या, रांगोळ्या या पारंपारिक गोष्टींचा विसर पडत चालला आहे.

# स्नेहलता कोल्हेंची नाराजी दूर करण्यासाठी चक्क अमित शाह यांची मध्यस्थी

प्रतिनिधी

■ अहिल्यानगर

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झालीय. तर जिल्ह्यातील कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाचा माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी पक्षनेतृत्वावर विश्वास ठेवत, निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतलाय. कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आशुतोष काळे हे अजित पवारांसोबत महायुतीत सहभागी झाल्याने त्यांची उमेदवारी निश्चित होती. त्यामुळं भाजपाच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्यासमोर राजकीय पेच निर्माण झाला होता. त्याही निवडणूक लढण्याच्या तयारीत होत्या. त्यामुळे हा पेच सोडविण्यासाठी राज्य आणि केंद्रस्तरावरून हालचाली सुरू



होत्या.

भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यानंतर मुंबई येथे स्नेहलता कोल्हे आणि पुत्र विवेक कोल्हे यांच्यात दोनदा बैठक पार पडली. फडणवीस यांनी कोल्हे यांच्या पक्षकार्याबाबतचा सकारात्मक अहवाल महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव यांना पाठवला. त्यानंतर भूपेंद्र यादव आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा करण्यात आली. आज स्नेहलता कोल्हे आणि पुत्र विवेक कोल्हे तसंच भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतली. पक्ष, कोल्हे कुटुंबीयांचा योग्य तो सन्मान राखेल असं अमित शाह यांनी सांगितलं. अमित शाह यांच्याकडून मिळालेल्या आश्वासनानंतर कोल्हे कुटुंबीयांनी विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

कोपरगाव विधानसभा मतदारसंघात कोल्हे-काळे पारंपरिक विरोधक राहिले आहेत. मात्र आज कोल्हेंनी पक्षनेतृत्वावर विश्वास ठेवत निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला असल्यानं कुठेतरी स्थानिक कार्यकर्त्यांनमध्ये नाराजी पहिला मिळतेय. कोल्हे आता काळेंना मदत करणार असल्यानं कोल्हे समर्थक काय भूमिका घेतात हेही पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# भाजपचे रमेश बुंदिले रवी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षात

प्रतिनिधी

■ अमरावती

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. सर्वच पक्षांतील नेते मंडळी पक्षांतर करत आहेत. अशामध्ये अमरावतीमध्ये रवी राणा यांनी भाजपला मोठा झटका दिला आहे. दर्यापूरचे भाजपाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते रमेश बुंदिले यांनी कार्यकर्त्यांसह रवी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षात प्रवेश केला. विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपसाठी हा मोठा धक्का असल्याचे म्हटले जात आहे.

अमरावतीच्या दर्यापूर मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाकडून माजी आमदार अभिजीत अडसूळ यांना महायुतीकडून उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे नाराज झालेल्या नेत्यांनी महायुतीमध्ये बंडखोरी करण्यास सुरूवात केली आहे. अभिजीत अडसूळ यांना उमेदवारी मिळाल्यामुळे भाजप नेते



रमेश बुंदिले नाराज झाले आहेत. कारण रमेश बुंदिले हे विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. पण त्यांना महायुतीकडून उमेदवारी न मिळल्यामुळे त्यांनी बंडखोरी करत युवा स्वाभिमान पक्षामध्ये प्रवेश केला आहे.

दर्यापूर मतदारसंघातून रमेश बुंदिले युवा स्वाभिमानकडून निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे आता अभिजीत अडसूळ आणि रमेश बुंदिले यांच्यात लढत होणार आहे. आमदार रवी राणा यांचा देखील अभिजित अडसूळ यांच्या उमेदवारीला विरोध आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यात महायुतीमध्ये ठिणगी पडल्याचे दिसून येत आहे.

## भाजपचे दिनकर पाटील मनसेच्या वाटेवर

■ नाशिक

नाशिक पश्चिम मतदारसंघातून मोठा ट्विस्ट समोर आला असून या ठिकाणावरून भाजपमध्ये पहिली बंडखोरी झाली आहे. भाजपचे दिनकर पाटील हे आता मनसेच्या वाटेवर आहेत. आज संध्याकाळी 6 वाजता ते राज ठाकरे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत पक्षप्रवेश करणार आहेत. लोकसभेनंतर विधानसभेला देखील डावलण्यात आल्यानं नाराज दिनकर पाटील यांनी आता बंडखोरी करत भाजपला रामराम ठोकण्याचा निर्णय घेतला आहे. दिनकर पाटील हे लोकसभा निवडणुकीत देखील निवडणूक लढवण्यात इच्छुक होते. त्यावेळी देखील त्यांना डावलण्यात आलं होतं. त्यांनंतर ते विधानसभेत देखील नाशिक पश्चिममधून इच्छुक होते. त्यांना उमेदवारी देण्यात आलेली नाही. त्यामुळे आता दिनकर पाटील यांनी बंडखोरी करत मनसेची वाट धरली आहे. दिनकर पाटील यांचं नाशिक पश्चिममध्ये मोठं प्रस्थ आहे. अशातच ते आज संध्याकाळी ते 6 वाजता राज ठाकरे यांच्या उपस्थितीत मनसेत प्रवेश करणार आहेत.

# 'घुंगुरकाठी'च्या 'दळवी कट्ट्या'वर जयवंत दळवींच्या आठवणींचा जागर

प्रतिनिधी

■ दोडामार्ग

जयवंत दळवींच्या आठवणी, चित्रफिती, अभिवाचन, साहित्यावर चर्चा अशा उपक्रमांनी आडाळी (ता. दोडामार्ग) येथील 'घुंगुरकाठी' संस्थेने आयोजित केलेल्या 'दळवी कट्ट्या'वर जयवंत दळवींच्या आठवणींचा जागर पार पडला. निमित्त होते ज्येष्ठ साहित्यिक जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीचे. दळवींचे पुतणे पुरुषोत्तम उर्फ सचिन दळवी, स्नुषा उर्मी दळवी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आरवली (शिरोडा) येथील ज्येष्ठ साहित्यिक जयवंत दळवींच्या जन्मशताब्दी वर्षाची सुरुवात यावर्षी १४ ऑगस्टला झाली. यानिमित्ताने काही तरी कार्यक्रम करावा, अशी कल्पना सुचल्यानंतर 'घुंगुरकाठी'चे अध्यक्ष सतीश लळीत व उपाध्यक्ष डॉ. सई लळीत यांनी 'दळवी कट्ट्या'च्या रुपाने




प्रत्यक्षात आणली. जिल्ह्यातील निवडक साहित्य रसिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

सुरुवातीला सतीश लळीत यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची संकल्पना सांगितली. सचिन दळवी यांच्याहस्ते दळवींच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. सचिन दळवी यांचा सत्कार शाल, श्रीफळ देऊन लळीत यांनी केला. डॉ. सई लळीत यांच्याहस्ते उर्मी दळवी यांचा 'चित्रकथी' शैलीतील गणपती, रिद्धी सिद्धीचं चित्र देऊन सत्कार करण्यात आला. विश्वकोश मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल ज्येष्ठ लेखिका वृंदा कांबळी यांचाही सत्कार शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला.

दळवी यांनी 'सुमारे सव्वा तास 'जयाकाकांच्या आठवणी' सांगून रसिकांना खिळवून टाकले. याबरोबरच दळवींच्या अनेक पुस्तकांतील प्रकरणांचे अभिवाचन, दळवींबद्दल पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या भाषणांच्या चित्रफिती, दळवींच्या साहित्यावर आणि एकंदर साहित्य व्यवहारावर मुक्त चर्चा असे कार्यक्रमाचे अनौपचारिक स्वरुप होते. उद्घाटन, अध्यक्ष, सूत्रसंचालक या सगळ्या उपचारांना फाटा देण्यात आला. असा मोकळाढाकळा कार्यक्रम दिवसभर मस्तपैकी रंगला. कार्यक्रमाच्या या स्वरुपामुळे प्रत्येकाला सहभागी होता आले.

सतीश लळीत यांनी 'अलाणे फलाणे'मधील एक प्रकरण सादर केले. डॉ. सई यांनी 'सारे प्रवासी घडीचे' मधील शांतू न्हावी सादर केला. पी. एल. कदम यांनी दळवीनी नाट्यचळवळीबद्दल एका लेखात मांडलेले विचार वाचून दाखवले. मधुभाईंच्या भाषणाची ४० मिनिटांची आणि प्रभावळकरांच्या भाषणाची १५ मिनिटांची चित्रफीत प्रोजेक्टरवर दाखविण्यात आली. नंतर सुमारे दीड तास दळवींच्या साहित्यावर मुक्त चर्चा झाली.

कार्यक्रम संपल्यानंतर जवळच्याच मोरगाव येथील माऊली मंदिर आणि म्हातारबाबा या लोकदैवताच्या ठिकाणाला सर्वांनी भेट दिली. अत्यंत निसर्गरम्य, शांत, रमणीय ठिकाणच्या या छोट्याशा सहलीने कार्यक्रमाची सांगता झाली. 'घुंगुरकाठी'च्या 'दळवी कट्ट्या'वर अशाप्रकारे दळवींच्या आठवणींचा गजर आणि जागर दिवसभर झाला.

उपस्थित रसिकांनी आपापला सुरेख सहभाग नोंदवला. सचिन दळवी, उर्मी वहिनी, ॲड. देवदत्त परुळेकर, सौ. मंगलताई परुळेकर, प्रा. विजय फातर्पेकर सर, श्रीमती पद्मा फातर्पेकर, ॲड. नकुल पार्सेकर, लेखिका वृंदा कांबळी, पुरुषोत्तम लाडु कदम, विनय सौदागर, अभिनेते श्याम नाडकर्णी, नीतिन वाळके, आडाळीचे सरपंच पराग गावकर, पित्रे आदिंनी सहभाग नोंदवला. दळवींसोबत घालवलेला एक दिवस आणि 'दळवी कट्ट्या'वर मारलेल्या गजाली बराच काळ स्मरणात राहतील, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

# बारामतीमधून अजित पवारच निवडणूक लढवणार: पुतण्या युगेंद्र पवार आव्हान देणार?

## 64 वर्षांनंतर इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची चिन्हे


प्रतिनिधी

■ पुणे

गेली अनेक दिवस राज्यात बारामती विधानसभा मतदारसंघाबद्दल चर्चा सुरू आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अजित पवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर दुसरीकडे शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली जाणार असल्याची माहिती आहे. यामुळे बारामतीमध्ये पुन्हा पवार विरुद्ध पवार अशी निवडणूक होणार आहे.

दरम्यान काही दिवसांपासून अजित पवार या मतदारसंघातून निवडणूक लढवणार नाही. त्यांचे सुपुत्र जय पवार हे मतदारसंघातून उभे राहतील अशा चर्चा सुरू होत्या. पण या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. अजित पवारांसह सुनील तटकरेंनी 38 उमेदवारांच्या नावाची





घोषणा केली आहे. यामुळे आता बारामतीमधून मविआतून उमेदवार कधी जाहीर होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी निवडणुकीच्या घोषणा होताच. शरद पवारांची भेट घेतली. त्यांच्या या भेटीत बारामती विधानसभा मतदारसंघातून युगेंद्र पवार यांच्या उमेदवारीवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे आता 64 वर्षांनंतर पुन्हा एकदा पवार बंधू एकमेकांच्या विरोधात प्रचारात उतरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. श्रीनिवास पाटील यांच्यासह त्यांच्या पत्नीदेखील अजित पवार यांच्याविरोधात टीका करताना दिसून येत आहे. तर दुसरीकडे युगेंद्र पवार यांनी बारामती मतदारसंघात मोठा जनसंपर्क वाढवला आहे. लोकसभा निवडणुकीच्सया प्रचारात त्यांनी मोठी आघाडी घेतली होती. यातच बारामतीमध्ये त्यांच्या नावाचे फिक्स आमदार असे बॅनर पहायला मिळाले. यासह पवार कुटुंबियांकडून बारामती विधानसभा मतदारसंघात युगेंद्र पवारांसाठी जोरदार तयारी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

खरं म्हणजे अजितदादा पवार नेहमी सांगतात की मी शब्दाचा पक्का आहे, मी दिलेला शब्द पाळतो. मी जे बोलतो तसेच करतो,असे ते नेहमी म्हणतात. ते जर खरंच शब्द पाळणारे असतील तर ते निवडणुकीला उभे राहणारही नाही, सांगता येत नाही असे अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी म्हटले आहे.

## 3 वेगवेगळ्या अपघातांत 3 जण ठार

■ पुणे

पुणे शहरात तीन वेगवेगळ्या अपघातात तीन जणांचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कात्रज-कोंढवा रस्ता, येरवड्यातील चंद्रमा चौक, तसेच खराडी भागात अपघाताच्या या घटना घडलेल्या आहेत. येरवड्यातील चंद्रमा चौकात एका कारवर भरधाव वेगात आदळून दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. संजय शिवाजी चौधरी असे मयत झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत पोलीस उपनिरीक्षक शब्बीर शेख यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. दुचाकीस्वार संजय येरवड्यातील चंद्रमा चौकातून भरधाव वेगाने जात असताना त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. दुचाकी कारवर जोरात आदळल्याने संजय चौधरी यांना गंभीर दुखापत झाली. भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

# आम्ही भटके विमुक्त जमातीचे, कुणी मतदान मागायला येऊ नका

प्रतिनिधी

■ नागपूर

भटक्या विमुक्त जमातीच्या वस्तीमध्ये सध्या झळकत असलेल्या बॅनरने या समाजाची खदखद दिसून येत आहे. साधे जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही, मग योजनांचा लाभ मिळणे तर शेकडो मैल दूर आहे, अशी भावना मांडत आमच्या वस्तीत कुठल्याही राजकीय पक्षाने मतदान मागायला येऊ नये, अशी खदखद वस्तीच्या नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विदर्भातील भटक्या विमुक्त जमातीच्या अशा अनेक वस्त्यांमध्ये असे बॅनर लावण्यात आल्याची माहिती आहे. साहेब आम्ही भारतीय आहोत आणि भटक्या विमुक्त जमाती मध्ये येतो. या जमातीकडे कोणतीही जमीन नाही, त्यामुळे महसूल पुरावा कोठून आनणार? आजोबा,




पणजोबा, वडील यांनी कधी शिक्षण घेतले नाही, मग त्यांच्या जातीची नोंद कोठून आणावी, अशी उद्विग्नता या वस्त्यांमधील नागरिकांनी व्यक्त केली. आता मुलं मोठी झाली, शिकायला लागली, त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा, आम्हला घरकुल मिळावे, यासाठी सर्वत्र जातीचे प्रमाणपत्र मागितले जातात. यासाठी अनेकदा जिल्हाधिकारी, तहसीलदार, आमदार, खासदार, नगरसेवक, समाजकल्याण अधिकारी यांचे उंबरठे चालून चप्पल झिजले आहेत, तरी प्रमाणपत्र मिळाले नाही. त्यामुळे आमची जात कोणती ते तरी ठरवून दया आणि त्याचे प्रमाणपत्र दया, अशी आर्त मागणी सर्व भटके विमुक्त जमातीच्या लोकांनी केली आहे. आता निवडणुकीचा वेळ आल्याने सर्व पक्षाचे उमीदवार घेऊन वस्तीत येणार. मात्र आयुष्याचे साधे प्रश्न सुटत नसतील तर या लोकशाहीचा लाभ काय? आमची जात वैध नाही, तर मग आमचे मतदान कसे वैध, असा उद्विग्न सवाल हे नागरिक करीत आहेत.

## अक्रॉस इंडिया सायकल रेसमध्ये डॉ. अमित समर्थ विजेता

**नवी दिल्ली :** अनुभवी सायकलिस्ट डॉ. अमित समर्थ यांनी इंडियन ऑइल रेस अक्रॉस इंडिया सायकल रेसच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये सोलो 18 ते 50 पुरुष श्रेणीमध्ये विजेतेपद पटकावले. श्रीनगर ते कन्याकुमारी लांबीच्या आशियासह भारतातील सर्वात मोठ्या रेसमध्ये सहभागी सायकलिस्टनी 3758 किलोमीटरचे अंतर कापले. रेसचे संस्थापक असलेल्या डॉ. समर्थ यांनी ही रेस 8 दिवस, 2 तास आणि 17 मिनिटांत पूर्ण केली. टीम पोलंडच्या फेचनारने दुसरा क्रमांक मिळवला. त्याने 9 दिवस, सात तास आणि 13 मिनिटांत रेस पूर्ण केली. कोल्हापूर टीमने 11 दिवस, 23 तास आणि 9 मिनिटे अशा वेळेसह सातवे स्थान मिळवले. 50 वर्षांपेक्षा जास्त पुरुष वयोगटात, दीपक अमीनने 10 दिवस, 3 तास आणि 39 मिनिटांत रेस पूर्ण करताना प्रथम स्थान पटकावले. 60 वर्षांपेक्षा जास्त सोलो पुरुष गटात दिलीप वरकड (12 दिवस 11 तास) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सह्याद्री टायगर्स संघाने 7 दिवस 9 तास 5 मिनिटांत रेस पूर्ण केली आणि रिले टीम ऑफ 2 मध्ये प्रथम स्थान मिळविले.



## रोटरी क्लब रॅपीडो कॅरम स्पर्धेत रिझवान-मधुराला प्रथम मानांकन




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

रोटरी क्लब ऑफ डोंबिवली आयोजित तसेच महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व ठाणे डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व रोटरी भवन, डोंबिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या रॅपिडो कॅरम सुपर सिक्स स्पर्धेत पुरुष एकेरी गटात मुंबई उपनगरच्या रिझवान शेख तर महिला एकेरी गटात ठाण्याच्या मधुरा देवळेला प्रथम मानांकन देण्यात आले आहे.

स्पर्धेचे उदघाटन शनिवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता करण्यात येईल. यानंतर पुरुष एकेरी गटाने सामन्यांना सुरुवात होईल. तर महिला एकेरी गटाचे सामने २७ ऑक्टोबर २०२४ रोजी खेळविण्यात येतील. महाराष्ट्र कॅरम असोसिशनच्या युट्यूब चॅनलवरून या सामान्यांचे थेट प्रक्षेपण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवाय विजेत्या खेळाडूंना रोटरी क्लब ऑफ डोंबिवलीच्या वतीने १ लाख १० हजारांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

***स्पर्धेतील मानांकन पुढीलप्रमाणे***

***पुरुष एकेरी :*** *१) रिझवान शेख (मुंबई उपनगर ), २) योगेश परदेशी (पुणे), ३) विकास धारिया ( मुंबई ), ४) सागर वाघमारे (पुणे), ५) झैद अहमद फारुकी (ठाणे ), ६) संजय मांडे (मुंबई), ७) पंकज पवार (ठाणे), ८) महम्मद घुफ्रान ( मुंबई )*

***महिला एकेरी :*** *१) मधुरा देवळे (ठाणे ) २) समृद्धी घाडीगावकर (ठाणे) ३) केशर निर्गुण (सिंधुदुर्ग ), ४) प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर), ५) आकांक्षा कदम ( रत्नागिरी ), ६ ) उर्मिला शेंडगे ( मुंबई ), ७) अनिता कनोजिया ( रायगड ), ८) संगीता चांदोरकर (मुंबई ),*

## आजपासून पुण्यात न्यूझीलंडविरुद्धची दुसरी कसोटी
# टीम इंडिया पुन्हा तीन स्पिनर्ससह मैदानात उतरणार

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना उद्यापासून पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर सुरू होणार आहे. पहिल्या कसोटीत भारताला ८ विकेट राखून पराभव स्वीकारावा लागला होता.

दुसऱ्या कसोटीतही भारतीय संघाचे संयोजन पहिल्या सामन्याप्रमाणेच राहू शकते, परंतु यावेळी काही नावे बदलू शकतात. त्यानंतर संघ पाच फलंदाज, एक यष्टीरक्षक, तीन फिरकीपटू आणि दोन वेगवान गोलंदाजांसह मैदानात उतरेल. मात्र, अंतिम ११ मध्ये प्रवेश करण्यापूर्वी संघ व्यवस्थापनाला तीन प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहेत. शुभमन गिल किंवा केएल राहुल खेळणार? गिल दुखापतीमुळे पहिली कसोटी खेळू शकला नाही. आता तो तंदुरुस्त आहे. राहुल पहिल्या कसोटीत नापास झाला होता, रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जाडेजासह तिसरा फिरकीपटू कुलदीप यादव असेल की अक्षर पटेल? पहिल्या कसोटीत कुलदीपला विशेष काही करता आले नाही. अक्षर आला तर फलंदाजी मजबूत होईल आणि सिराज की आकाशदीप बुमराहसोबत असेल का? सिराज त्याच्या जुन्या लयीत नाही. आकाशदीप नव्या चेंडूवर विकेट घेत आहे. फलंदाजीही करू शकतो.

प्लेइंग-११ मध्ये टीम इंडिया पुन्हा दोन वेगवान गोलंदाजांना संधी देऊ शकते. जसप्रीत बुमराह खेळणार आहे. मोहम्मद सिराजला आकाश दीपकडून दुसऱ्या वेगवान गोलंदाजाचे आव्हान आहे. शेवटच्या सामन्यात मोहम्मद सिराज वेगवान गोलंदाजांना अनुकूल खेळपट्टीवरही फारसा प्रभावी ठरला नाही.सिराजने या वर्षात घरच्या मैदानात ७ कसोटी सामने खेळले असून ४२.८३ च्या सरासरीने केवळ १२ विकेट्स घेतल्या आहेत. जसप्रीत बुमराहने ७ सामन्यात ३३ विकेट घेतल्या आहेत. आकाश दीपने भारतासाठी आतापर्यंत 3 कसोटी सामने खेळले आहेत, ज्यात त्याने २३.१२ च्या सरासरीने ८ विकेट घेतल्या आहेत. आकाश दीपची फलंदाजीही सिराजपेक्षा मजबूत आहे.

टीम इंडियाच्या १६ सदस्यीय संघात ५ खेळाडू बेंचवर बसतील. यष्टीरक्षक ध्रुव जुरेल, राहुल किंवा गिल यापैकी एक आणि कुलदीप यादव, मोहम्मद सिराज आणि वॉशिंग्टन सुंदर हे बाहेर जाण्याची शक्यता जास्त आहे.

### गिल किंवा राहुलला संधी



***सरफराजने आपली जागा निश्चित केलीय***

*गिल बंगळुरू कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळणार होता, पण सामन्यापूर्वी त्याला दुखापत झाली. त्याच्या जागी सरफराज खानला संधी मिळाली. सरफराजने संधीचा पुरेपूर फायदा घेत शतक झळकावले. त्याला आता बाहेर ठेवणे संघ व्यवस्थापनासाठी खूप कठीण जाईल. अशा परिस्थितीत गिलला प्लेइंग-११ मध्ये आणायचे असेल तर केएल राहुलला बाहेर बसावे लागेल.यशस्वी जैस्वाल, रोहित शर्मा, विराट कोहली, ऋषभ पंत यांना वगळता येणार नाही. अशा परिस्थितीत केएल राहुलची बाद होण्याची पाळी आहे.राहुलला आणखी एक संधी दिल्यास गिल या वेळीही बेंचवर असेल.*

## शालेय कुस्ती स्पर्धेत शारदाश्रम शाळेला 7 सुवर्ण

### प्रथमेश गोडसे तिसऱ्यांदा विजेता



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र शासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या शालेय स्तरावरील कुस्ती क्रीडा स्पर्धेत दादरच्या शारदाश्रम शाळेने सात सुवर्ण, सहा रौप्य आणि चार कास्य पदके पटकावली आहेत. तर ९२ किलो वजनी गटात प्रथमेश गोडसे याने यावर्षी कास्य पदक जिंकले असून सलग तिसऱ्यांदा विजेता ठरला आहे.

नुकत्याच झालेल्या शालेय स्तरावरील कुस्ती क्रीडा स्पर्धेत 17 वर्षे खालील मुले वयोगटात महाराष्ट्र शासन आयोजित शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा १७ वर्षाखालील वयोगटात आपल्या शाळेतील खेळाडूंनी ४ सुवर्ण,1 रजत व २ कास्य पदक विजेते पुढीप्रमाणे:

१) ५१ किलो-स्वाजित कदम- सुवर्ण, २) ७१ किलो- ओम् मगदुम- सुवर्ण, ३)८० किलो- आदित्य पाटील- सुवर्ण, ४) ९२ किलो- आदर्श सिंघम- सुवर्ण, ५)५५ किलो- विग्नेश देशमाने- सिल्वर, ६) ६५ किलो- संकेत पाटील- कास्य७) ९२ किलो- प्रथमेश गोडसे - कास्य

१४ वर्षाखालील मुलांनी २ रजत आणि २ कास्य पदके पटकावली असून ती पुढीप्रमाणे:

१) ३५ किलो- रुद्र चव्हाण



- सिल्व्हर, २) ७५किलो- समीर गावकर - सिल्व्हर, ३) ३८ किलो - शोल्क नलावडे - कास्य, ४) ७५ किलो - सिधेश वाघमारे - कास्य,

तर १७ वर्षाखालील मुलीच्या वयोगटात शाळेतील खेळाडूंनी ३ सुवर्ण,२ रजतपदक पटकाविले. त्या पुढीप्रमाणे:

१) ४९ किलो-वेदिका तिरलोटकर-सुवर्ण, २) ६१किलो- विजया कोडवाले-सुवर्ण, ३)६९ किलो-पांजल राऊळ- सुवर्ण, ४) ४६ किलो- वर्षा खिलारे- सिल्व्हर, ५)४९ किलो- सुहानी नाईक- सिल्वर १४ वर्षाखालील गटात ५० किलो- तन्या हळंदे- सिल्व्हर पदक पटकावले.

प्रथमेश गोडसे याने शालेय कुस्ती मध्ये २०२२-२३ मध्ये रजत, तर २०२३-२४ मध्ये रौप्य आणि यंदा कास्य पदक पटकावले आहे. सर्व विजेत्यांचे शाळेकडून कौतुक करण्यात आले.

# सँटनर न्यूझीलंडच्या वनडे आणि टी-20 संघाचा कर्णधार; विल्यमसनने कर्णधारपद सोडले

**वृत्तसंस्था**
■ **कोलंबो**

न्यूझीलंडने पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्धच्या ३ वनडे आणि २ टी-२० मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे. संघाचे कर्णधारपद मिचेल सँटनरकडे सोपवण्यात आले आहे. भारतासोबत कसोटी मालिका खेळल्यानंतर किवी संघाला श्रीलंका दौऱ्यावर जायचे आहे.

सध्या न्यूझीलंडचा संघ भारतीय दौऱ्यावर आहे. येथे किवींना तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे. पहिला कसोटी सामना जिंकून न्यूझीलंडने १-० अशी आघाडी घेतली आहे. किवी संघात प्रथमच गोलंदाजी अष्टपैलू नॅथन स्मिथ आणि यष्टिरक्षक फलंदाज मिचेल हे यांना संधी देण्यात आली आहे.

१५ जुलै १९९८ रोजी ड्युनेडिन, ओटागो येथे जन्मलेल्या नॅथन स्मिथने आतापर्यंत देशांतर्गत क्रिकेटमध्ये ३२९६ धावा केल्या आहेत, तर २६४ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने ५३ प्रथम श्रेणी, ४६ लिस्ट ए आणि ६० टी-२० सामने खेळले आहेत. त्याने प्रथम श्रेणीमध्ये १९१९ धावा, लिस्ट ए मध्ये ८७२ धावा आणि टी-२० मध्ये ५०५ धावा केल्या आहेत. तर त्याने फर्स्ट क्लासमध्ये १४४ , लिस्ट ए मध्ये ५५ आणि टी-२० मध्ये ६५ विकेट घेतल्या आहेत.

नॅथन स्मिथला या वर्षी मार्चमध्ये ANZ न्यूझीलंड क्रिकेट पुरस्कारांमध्ये न्यूझीलंड क्रिकेटचा वर्षातील सर्वोत्तम पुरुष खेळाडूचा किताब मिळाला. नॅथन स्मिथने गेल्या उन्हाळ्यात फायरबर्ड्ससाठी एकदिवसीय आणि टी-२० मध्ये २४ विकेट घेतल्या..२० ऑगस्ट २००० रोजी कँटरबरी येथे जन्मलेल्या मिचेल याने आतापर्यंत १९ प्रथम श्रेणी, २० लिस्ट ए आणि २८ टी-२० सामने खेळले आहेत. यामध्ये त्याने प्रथम श्रेणीत १२४४ धावा, एकदिवसीय सामन्यात ४१० धावा आणि टी-२० मध्ये ३०८ धावा केल्या. विकेटच्या मागे त्याच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाले तर त्याने प्रथम श्रेणीमध्ये ६१ , एकदिवसीयमध्ये १५ आणि टी २०मध्ये १५ झेल घेतले आहेत.

### पहिला सामना ९ नोव्हेंबर रोजी श्रीलंकेविरुद्ध



# केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून विजय बाबू वसंता आणि अमन प्रीत यांची नियुक्ती

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मुंबई शहर जिल्ह्यातील १७८ - धारावी, १७९- सायन कोळीवाडा, १८० - वडाळा, १८१- माहीम, १८२ - वरळी या पाच विधानसभा मतदारसंघाचे केंद्रीय खर्च निरीक्षक म्हणून विजय बाबू वसंता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, १८३ - शिवडी, १८४- भायखळा, १८५ - मलबार हिल, १८६- मुंबादेवी, १८७ - कुलाबा या पाच विधानसभा मतदारसंघाचे केंद्रीय खर्च निरीक्षक म्हणून अमन प्रीत यांची भारत निवडणूक आयोगाकडून नियुक्ती करण्यात आली आहे.



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ करिता नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक विजय बाबू वसंता आणि अमन प्रीत यांनी जिल्हा माध्यम संनियंत्रणासाठी माध्यम देखरेख नियंत्रण कक्षास भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव, अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी निवडणूक फरोग मुकादम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्यामसुंदर सुरवसे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यादव यांनी माध्यम कक्ष व सी-व्हिजील कक्षातील कामकाजाविषयी माहिती दिली. माध्यम कक्षाद्वारे इलेक्ट्रॉनिक, मुद्रीत व समाजमाध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सांगितले. सी व्हिजील ॲपवर येणाऱ्या तक्रारींबाबतही तातडीने कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यादव यांनी यावेळी सांगितले. यावेळी माध्यम कक्षाच्या समन्वय अधिकारी काशीबाई थोरात यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली.

# पालिकेतील 52 हजार रिक्त शेड्युल्ड पदे भरली जात नाही तो पर्यंत 1800 कंत्राटी कामगारांची सेवा खंडित करू नये - बाबा कदम

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिकेतील ५२,२२१ रिक्त शेडयुल्ड पदे न भरता, १ हजार ८३२ हंगामी पदे रद्द केल्याने, कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. पालिकेतील ही शेड्युल्ड पदे भरली जात नाहीत, तोपर्यंत रिक्त पदांच्या सापेक्ष घेण्यात आलेल्या १ हजार ८३२ हंगामी/ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा खंडीत न करता त्यांच्या कंत्राटाचे नुतनीकरण करावे अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मुंबई महानगरपालिका मुंबईतील सुमारे सव्वा कोटी जनतेला नागरी सेवा पुरविण्याचे काम करते. हे काम विविध खाती विभाग तसेच रुग्णालयांमार्फत केले जाते. मुंबईतील जनतेला विविध नागरी सेवा पुरविण्यासाठी जे विभाग/ खाती / रुग्णालये कार्यान्वित आहेत. त्या ठिकाणी कामगार, कर्मचारी, अधिकारी किती असावेत याचा अभ्यास करुन, रचना व कार्यपध्दती विभागाने शेडयुल्ड पदे निर्माण केलेली आहेत. शेडयुल्ड पदांवरील कर्मचारी योग्य पध्दतीने नागरी सेवा देण्याचे काम अविरतपणे करीत आहेत.

मागील काही वर्षांपासून सेवानिवृत्ती, निधन व अन्य कारणांमुळे रिक्त होणारी वरील शेड्युल्ड पदे भरली न गेल्याने, तब्बल ५२,२२१ शेडयुल्ड पदे रिक्त झालेली आहेत. रिक्त पदांमुळे नागरी सेवेवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून अत्यावश्यक सेवेतील रिक्त पदांच्या सापेक्ष हंगामी/ कंत्राटी/रोजंदारी बहुउद्देशीय इ. कामगारांकडून कामे करवून घेण्याचे काम पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांची रिक्त शेडयुल्ड पदे भरावीत यासाठी पालिकेतील सर्वच कामगार संघटनांनी वेळोवेळी मागणी केलेली आहे. त्यावर सन २०२२ पासून "बिंदु नामावली तयार करण्याचे काम पूर्ण झाल्यावर रिक्त पदे भरली जातील" असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले होते.

अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या अर्हताधारक कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाच्या भरती धोरणाच्या अधिन राहून, रिक्त पदी सामावून घ्यावे, अशी "म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने" ची मागणी असताना, त्यांना कायम केले गेले नाही. याउलट प्रशासनाच्या चुकीमुळे या हंगामी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती दिली गेली नाही आणि कायमस्वरुपी नियुक्ती दिली गेली नाही म्हणून सदर हंगामी नियुक्त्याच रद्द करणे हे अनाकलनीय आहे. असेही बाबा कदम यांनी म्हटले आहे.

पालिकेत आधीच मनुष्यबळाअभावी त्रस्त असलेल्या कर्मचारी वर्गाला, कर्मचारी भरती करुन दिलासा देण्याऐवजी, त्यांना थोडीफार मदत करणारे हंगामी / कंत्राटी कर्मचारीच काढून घेणे म्हणजे त्यांच्यावर प्रचंड कामाचा ताण वाढणार आहे. खासकरुन रुग्णालयीन सेवा देताना कर्मचारी व डॉक्टर तसेच रुग्णांचे नातेवाईक यांच्यामध्ये कायम संघर्ष होणार आहे. त्यामुळे कामगारांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

पालिकेतील ही शेड्यूल्ड पदे भरली जात नाहीत, तोपर्यंत रिक्त पदांच्या सापेक्ष घेण्यात आलेल्या १ हजार ८३२ हंगामी/ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा खंडीत न करता त्यांच्या कंत्राटाचे नुतनीकरण करावे अशी मागणीही करण्यात आली आहे.

# मध्य रेल्वेच्या 98 रेल्वे स्थानकांचा होणार कायापालट

### रेल्वेस्थानके घेणार सुंदर हायटेक रूप

### ५०१४.४१ कोटी रुपये खर्चाला मंजुरी

**सुनील शिंदे**
■ **मुंबई**

मध्य रेल्वेच्या प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणावर रेल्वे स्थानकांचे अपग्रेडेशन करून भारतीय रेल्वेमध्ये एक मोठे परिवर्तन घडवून आणले जात आहे आहे. "अमृत भारत स्टेशन योजना" (एबीएसएस) अंतर्गत, मध्य रेल्वेवरील रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे,

ऑगस्ट २०२३ आणि फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रातील अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत ७६ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली तेव्हा या अभियानाला मोठी चालना मिळाली होती आणि सध्या त्याचे काम जोरात सुरू आहे. मूळ निवड झालेल्या ७६ स्थानकांपैकी ७ स्थानकांच्या सॉफ्ट अपग्रेडेशनची कामे पूर्ण झाली आहेत. नुकत्याच समाविष्ट झालेल्या ३ स्थानकांसाठी (जळगाव, अक्कलकोट आणि पनवेल) प्राथमिक कामे हाती घेतली जात आहेत जी चालू वर्षात मंजूर झाली आहेत. असे मध्या रेल्वेने कळविले.आहे.

मध्य रेल्वेमध्ये, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, नागपूर आणि अजनी या ३ स्थानकांवर मुख्य अपग्रेडेशनचे काम सुरू आहे आणि त्यांची एकूण भौतिक प्रगती अनुक्रमे ५%, ३२% आणि ३२% आहे. मध्य रेल्वेने प्रमुख अपग्रेडेशन कामासाठी आणखी १६ स्थानके निवडली आहेत, ती म्हणजे दादर, ठाणे, ठाकुर्ली, कल्याण, लोकमान्य टिळक टर्मिनस-एलटीटी, लोणावळा, भुसावळ, अकोला, अमरावती, खंडवा, नाशिक रोड, वर्धा, पुणे, मिरज, शिवाजी नगर आणि साई नगर शिर्डी या स्थानकांवर डीपीआर अंदाज प्रगतीपथावर आहेत.

एबीएसएस धोरण रेल्वे मंत्रालयाने तयार केले होते ज्याचे उद्दिष्ट रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करणे, दीर्घकालीन दृष्टीकोनातून सतत विकासाची कल्पना करणे हे आहे. ही कल्पना एका मास्टर प्लॅननुसार विविध गंभीर घटकांच्या अंमलबजावणीवर आधारित आहे जी सतत वाढत्या गरजा आणि रेल्वे स्थानकांचे वर्धित संरक्षण पूर्ण करते. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत नियोजित सुविधांमध्ये हे समाविष्ट आहे.

मध्य रेल
Central Railway

"एक स्टेशन एक उत्पादन" योजनेसाठी स्टॉल निश्चित करणे. स्थानकांचा 'शहर केंद्र' म्हणून विकास. सुव्यवस्थित वाहतूक अभिसरण आणि आंतर-मॉडल एकत्रीकरण.,एबीएसएस अंतर्गत ओळखल्या गेलेल्या ७९ रेल्वे स्थानकांच्या आणि स्थानकांच्या १९ मोठ्या अपग्रेडेशन व्यतिरिक्त, १० मुंबई उपनगरी स्थानकांचा पुढील विकास मुंबई रेल्वे विकास महामंडळ द्वारे स्टेशन सुधारणा कामासाठी प्रगतीपथावर आहे, घाटकोपर, भांडुप, मुलुंड, डोंबिवली, नेरळ आणि कसारा मेल लाईनवर, हार्बर मार्गावरील जीटीबी नगर, मानखुर्द, गोवंडी आणि चेंबूर. ही स्थानके आता पुनर्विकासाद्वारे हायटेक रूप घेणार आहेत.

### अशा होणार सुधारणा

- **मोहक स्टेशन बिल्डिंग** -नवीन स्टेशन बिल्डिंग स्टेशनच्या आर्किटेक्चरल लँडस्केपला पुन्हा परिभाषित करेल, आधुनिक आणि आकर्षक डिझाइन असेल.
- **स्वच्छ भारत लक्ष केंद्रित** - स्वच्छ भारत मिशनच्या बरोबरीने, स्टेशन एक मॉड्यूलर सीवेज ट्रीटमेंट प्लांट सुरू करेल, कार्यक्षम सांडपाणी प्रक्रिया आणि स्वच्छ वातावरण सुनिश्चित करेल.
- **मनमोहक प्लॅटफॉर्म** - प्लॅटफॉर्मच्या भिंतींवर मनमोहक लँडस्केपिंग सुरू करून, प्लॅटफॉर्ममध्ये पुनरुत्थान आणि सौंदर्याची उन्नती होणार.
- **प्रवाशांच्या सुविधा** -प्रवाश्यांना उत्तम आसन, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि प्लॅटफॉर्मवर आणि स्टेशन इमारतीच्या आत सुधारित प्रकाश आणि वेंटिलेशन यासह सुधारित सुविधांचा आनंद मिळेल.
- **वर्धित कनेक्टिव्हिटी** - एक सुधारित फूट ओव्हर ब्रिज, अतिरिक्त लिफ्ट आणि एस्केलेटर सुविधांनी पूरक, प्रवाशांची हालचाल आणि सुलभता सुलभ करेल.
- **मार्गदर्शन आणि माहिती** -आधुनिक ट्रेन इंडिकेशन बोर्ड आणि प्रवासी-अनुकूल चिन्हे स्टेशन परिसरात अखंड मार्गदर्शन सुलभ करतील.
- **कार्यात्मक सुधारणा** - विद्यमान बुकिंग कार्यालय आणि इतर प्रशासकीय इमारतींचे संपूर्ण नूतनीकरण केले जाईल, त्यांना योजनेच्या व्यापक दृष्टीकोनासह संरेखित केले जाईल.
- **सर्वसमावेशकता सर्व सुधारणा** - दिव्यांगजन (विशेष-अपंग) मैत्रीपूर्ण, सर्वांसाठी समान प्रवेश आणि सुविधा सुनिश्चित करण्यासाठी डिझाइन केल्या जातील.

## मुंबईमध्ये विजेमुळे आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ

**मुंबई:** : मुंबईतील कमला मिल कंपाउंडमध्ये असलेल्या एका 15 मजली इमारतीमध्ये 6 सप्टेंबर रोजी आग लागली व अलीकडच्या वर्षांमध्ये ही ह्या भागातली अशी आगीची तिसरी घटना होती. त्यामुळे शहरात शॉर्ट सर्किटमुळे आगी लागण्याच्या घटनांत वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहेकोणालाही दुखापत झाली नसल्याचे समोर आले, तरी ह्या आगीने 7 व्या ते 10 व्या मजल्यांवरील कार्यालयांच्या जागेचे नुकसान केले. इमारतीच्या काचेच्या संरचनेमुळे आत धूर कोंडला गेल्यामुळे अग्नी शमन करणा-यांसमोर आव्हान निर्माण झाले होते. इमारतीच्या कार्यरत अग्नी शमन प्रणालींनी ज्वाळांना नियंत्रणात आणण्यासाठी मदत केली. काचेच्या इमारतींच्या सुरक्षा नियमनांसंदर्भात ह्या घटनेमुळे नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत व कठोर निगराणी व सुधारित उपकरणे हवीत, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## मिहीर कोटेचा मुलुंड विधानसभेसाठी उद्या उमेदवारी दाखल करणार

### रोड शो मध्ये सामील होण्याचे मुलुंडवासियांना आवाहन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुलुंडचे आमदार आणि भाजप आणि महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा हे उद्या, गुरुवारी, २४ ऑक्टोबर रोजी गुरुपुष्यामृत योगच्या दिवशी मुलुंड विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी जंगी 'रोड शो ' करणार आहेत. रोड शो मध्ये मुलुंडवासियांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे, असे आवाहन आमदार मिहीर कोटेचा यांनी केले आहे. मुलुंड पूर्व, हनुमान नगर येथील हनुमान चौकातून गुरुवारी, सकाळी दहा वाजता कोटेचा यांच्या रोड शोचा प्रारंभ होणार आहे.

'विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्यांदा मुलुंडच्या सूपुत्राला आशीर्वाद देण्यासाठी या रोडशो मध्ये सामील व्हावे', असे आवाहन कोटेचा यांनी मुलुंडमधील मतदारांना केले आहे.मिहीर कोटेचा हे मुलुंडचे विद्यमान आमदार आहेत. त्यांना भाजपने येथून दुसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. भाजपने प्रसिद्ध केलेल्या पहिल्याच उमेदवार यादीमध्ये कोटेचा यांच्या नावाचा समावेश आहे.



कोटेचा हे भाजप महाराष्ट्र प्रदेशचे कोषाध्यक्ष आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मुलुंडमध्ये भाजप उमेदवार मिहीर कोटेचा यांना तब्बल ८७,२५३ मते पडली होती तर 'मनसे'च्या उमेदवार हर्षला चव्हाण यांनी दुसऱ्या क्रमांकाची २९,९०५ मते घेतली होती. कोटेचा यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला होता.bगेली ३४ वर्ष कोटेचा हे भाजपमध्ये सक्रिय पदाधिकारी असून मुलुंडमध्ये मराठी दांडिया आणि दीपोत्सवाचे आयोजन करण्यामध्ये त्यांचा पुढाकार राहिलेला आहे.

## विमानांना धमकी प्रकरणात सरकारचा X-मेटाला सवाल

**नवी दिल्ली:** बुधवारी, आयटी मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X, मेटा आणि विमान कंपन्यांशी विमानांना बॉम्बच्या धमक्यांबाबत आभासी बैठक घेतली. सरकारने विचारले की तुम्ही या धोकादायक अफवा रोखण्यासाठी काय केले? तुम्ही तर गुन्ह्याला प्रोत्साहन देत होता हे परिस्थितीवरून स्पष्ट होते. सूत्रांच्या हवाल्याने मीडिया रिपोर्ट्समध्ये या बैठकीची माहिती देण्यात आली आहे. गेल्या 9 दिवसांत 170 हून अधिक विमाने धोक्यात आली आहेत. वृत्तानुसार, या धमक्यांमुळे विमान वाहतूक क्षेत्राला सुमारे 600 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. देशातील प्रवासी विमानांना धमक्यांची मालिका सुरूच आहे. मंगळवारीही 50 हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या होत्या. यामध्ये एअर इंडिया आणि इंडिगोच्या प्रत्येकी 13 फ्लाइट्स, आकासा एअरच्या 12 हून अधिक फ्लाइट्स आणि विस्ताराच्या 11 फ्लाइट्सना धमक्या आल्या होत्या.



# अचानक सर्वकाही ठीक होईल, या भ्रमात राहू नका!

## माजी लष्करप्रमुख जनरल व्हीके सिंग यांनी टोचले कान



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेला भारत-चीन सीमावाद अखेर संपुष्टात आला. लडाखच्या सीमावर्ती भागात गस्त घालण्यासाठी एक करार करण्यात आला आहे, ज्याला दोन्ही देशांनी मंजुरी दिली आहे. दरम्यान, यावर आता देशाचे माजी लष्करप्रमुख आणि विद्यमान परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री जनरल व्ही के सिंग यांनी महत्वाची प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, 'भारत आणि चीनमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून राजनैतिक आणि लष्करी चर्चा सुरू आहे. लष्करी स्तरावर पूर्वी काही मतभेद होते, पण आता हे एक चांगले पाऊल उचलले गेले आहे. याचे श्रेय पंतप्रधान मोदींना जाते.'

एका हिंदी वृत्तवाहिनीसोबत केलेल्या विशेष संवादात जनरल व्ही के सिंह पुढे म्हणतात, 'या करारानंतर दोन्ही सैन्य डेपसांग आणि डेमचोकबाबत चर्चा करुन पुढील दिशा ठरवतील. परंतू मला असे वाटते की, हे भारताचे मोठे यश आहे, पण स्थानिक स्तरावर लागू होण्यास थोडा वेळ लागेल. अचानक सर्वकाही ठीक होईल, या भ्रमात आपण राहू नये. करारानंतर भविष्यातील रूपरेषा काय असेल, हे आज सांगणे कठीण आहे. त्याचे काही नियम राजनैतिक आणि लष्करी पातळीवर ठरवले जातील.'

भारत आणि चीनमधील संबंध प्रदीर्घ काळ तणावपूर्ण होते, परंतु आता दोन्ही देशांनी सीमावादावर काही करार केले आहेत. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी सोमवारी दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि चीन यांच्यात गस्त करार झाला आहे. यामुळे भारतीय सैन्य येथे पुन्हा गस्त घालण्यास सक्षम असेल. पूर्व लडाखच्या गलवान खोऱ्यात दोन्ही देशांच्या सैन्यात हिंसक चकमक झाल्यानंतर तणाव निर्माण झाला होता. पण, आता या करारामुळे सर्वकाही सुरळीत होण्याची शक्यात आहे.

विक्रम मिस्त्री पुढे म्हणाले की, गलवान खोऱ्यातील घटनेनंतर काही गस्त स्थळांवर गस्त बंद करण्यात आली होती, मात्र या ठरावामुळे तणाव कमी होण्यास मदत होणार आहे. चीनने काही भागात लष्करी तळही बांधले, ज्यामुळे तणाव आणखी वाढला होता. पण, आता याचे समाधान या ठरावानंतर मिळू शकते. या करारानंतर डेपसांग आणि डेमचोकसारख्या संवेदनशील भागात परिस्थिती सुधारेल.

# ही माझी नवी सुरुवात!



## प्रियंका गांधींनी वायनाड येथून भरला उमेदवारी अर्ज

वृत्तसंस्था
वायनाड

वायनाड लोकसभा मतदारसंघामध्ये होत असलेल्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांच्यासह काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी वायनाडमध्ये काँग्रेसकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. तसेच प्रियंका गांधी यांनी रोड शो करत वायनाडमधील मतदारांना अभिवादन केले.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीत रायबरेली आणि वायनाड अशा दोन लोकसभा मतदारसंघांमधून विजय मिळाल्यानंतर वायनाडमधील खासदारकीचा राजीनामा दिला होता. त्यामुळे या मतदारसंघातील जागा रिक्त झाली होती. तिथे काँग्रेसकडून प्रियंका गांधी यांना उमेदवारी घोषित करण्यात आली होती. दरम्यान, आज प्रियंका गांधी यांनी रोड शो च्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रियंका गांधी यांच्या रोड शोमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी हे नेते उपस्थित होते. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी सकाळी ११ वाजता कलपेट्टा न्यू बस स्टँड येथून रोड शो ला सुरुवात केली. या रोड शोनंतर प्रियंका गांधी यांनी सभेला संबोधित केले.

यावेळी प्रियंका गांधी म्हणाल्या की, मागच्या ३५ वर्षांपासून मी वेगवेगळया निवडणुकांसाठी प्रचार करत आहे. आता मी पहिल्यांदाच तुमच्या पाठिंब्याची मागणी करण्यासाठी इथे आले आहे. ही एक वेगळी जाणीव आहे. मला वायनाड येथून निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारी दिल्याबद्दल मी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे आभार मानते.

पान १ वरुन

### दहशतवादाचा सामना करताना दुटप्पीपणा नको : मोदी

**ब्रिक्समध्ये काळाबरोबर स्वत:मध्ये बदल घडवण्याची इच्छाशक्ती आहे. हा आदर्श संपूर्ण जगासमोर ठेवत, जागतिक संस्थांमधील सुधारणांसाठी एकमताने आवाज उठवण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, बहुपक्षीय विकास बँका, डब्ल्यूटीओ यांसारख्या जागतिक संस्थांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी आपण कालबद्ध रीतीने पुढे जायला हवे. त्यामुळे जागतिक संस्थांमध्ये केवळ सुधारण नव्हे तर बदलही घडविण्याचे ध्येय असावे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संबोधनात म्हटले आहे.**

### मुख्यमंत्री शिंदेंनी घेतले कामाख्या देवीचे घेतले दर्शन

**ते म्हणाले, मी कामाख्या देवीचे आशीर्वाद घेण्यासाठी गुवाहाटीला आलो. शिवसेनेने आपली पहिली यादी जाहीर केली असून, दुसरी यादीही लवकरच जाहीर होईल. या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आमचेच सरकार येईल याविषयी कोणतीही शंका नाही.**

# तस्लिमा नसरीन यांना भारतीय निवास परवाना मिळाला

## भारत माझे दुसरे घर - नसरीन

### गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे मागितली होती मदत



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

गृह मंत्रालयाने मंगळवारी निर्वासित बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांच्या भारतीय निवास परवान्याची मुदत वाढवली. परवानगी मिळाल्यानंतर लेखिकेने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले.

बांगलादेशी लेखकाने 22 ऑक्टोबर रोजी गृहमंत्र्यांकडे मदत मागितली होती. त्यांनी लिहिले की माझ्या भारतीय निवास परवान्याची मुदत जुलैमध्ये संपली आहे आणि गृह मंत्रालय त्याचे नूतनीकरण करत नाही. तस्लिमा यांनी लिहिले होते की, भारत माझे दुसरे घर आहे आणि 22 जुलैनंतर परमिटचे नूतनीकरण न झाल्याने मी त्रस्त आहे. सरकारने मला भारतात राहण्याची परवानगी दिली तर मी त्यांचा आभारी राहीन.

बांगलादेश सध्या तीव्र सत्तासंघर्षाचा सामना करत आहे. काही महिन्यांपूर्वी माजी पंतप्रधान शेख हसीना यांची सत्तेवरून हकालपट्टी झाल्यापासून परिस्थिती अस्थिर आहे. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारसमोर सध्या लोकशाही संस्था पुनर्स्थापित करण्याचे आव्हान आहे. नसरीन 2011 पासून भारतात नसरीन 2011 पासून भारतात राहत असून त्यांच्याकडे स्वीडिश नागरिकत्व आहे. भारत सरकारच्या अधिकाऱ्यांकडून त्यांच्या निवास परवान्याच्या स्थितीबाबत कोणतीही माहिती न मिळाल्याबद्दल त्यांनी यापूर्वीच अनेकदा चिंता व्यक्त केली आहे.

गेल्या महिन्यात, त्यांनी सांगितले की त्या नियमितपणे त्यांच्या अर्जाची स्थिती ऑनलाइन तपासतात, परंतु तरीही ते 'अपडेटिंग' दर्शवते, जे यापूर्वी कधीही झाले नव्हते. बांगलादेश आणि तेथील राजकारणाशी आपला काहीही संबंध नाही, असेही त्या म्हणाल्या.

# राष्ट्रपती शहाबुद्दीन म्हणाले, माझ्याकडे हसीनांचा राजीनामा नाही

## संतप्त लोकांनी राष्ट्रपती भवनाला घातला घेराव



वृत्तसंस्था
ढाका

बांगलादेशमध्ये पंतप्रधान शेख हसीना यांना हटवल्यानंतर राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांना हटवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. बांगलादेशी वृत्त डेली स्टारने दिलेल्या माहितीनुसार, राजधानी ढाका येथील राष्ट्रपती भवनासमोर हजारो लोक जमले होते. शेख हसीना यांच्या राजीनाम्याबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे ते संतप्त झाले होते.

शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्याचे मी नुकतेच ऐकले, परंतु त्यांच्या राजीनाम्याशी संबंधित कोणतेही पुरावे माझ्याकडे नाहीत. त्यांचा राजीनामा घेण्यासाठी मी अनेकवेळा प्रयत्न केले होते पण कदाचित त्यांच्याकडे त्यासाठी वेळ नव्हता.

राष्ट्रपतींनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. त्यांनी राष्ट्रपतींना 2 दिवसांत पद सोडण्याची मागणी केली. आंदोलकांचा जमाव हिंसक झाल्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.

चेंगराचेंगरीत किमान 5 जण जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आंदोलकांनी दगडफेक सुरू केल्याने त्यांनी कडक कारवाई केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# काश्मिरातील दरबार स्थानांतर बहाल करणार अब्दुल्ला सरकार

वृत्तसंस्था
श्रीनगर

ओमर अब्दुल्ला यांचे सरकार जम्मू-काश्मिरातील 150 वर्षे जुनी दरबाराचे स्थानांतर करण्याची परंपरा पुनर्संचयित करण्याच्या तयारीत आहे. जम्मू आणि काश्मीर मंत्रालयाशी संबंधित सूत्रांनी दिव्य मराठीला सांगितले की, अब्दुल्ला सरकारच्या पुढील कॅबिनेट बैठकीत दरबार मूव्ह म्हणजेच दरबार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवण्याची परंपरा पुनर्संचयित करण्याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो.

ती पुन्हा सुरू होण्यामागील तर्क असा आहे की ही परंपरा बंद केल्याने जम्मूमधील व्यवसायावर नकारात्मक परिणाम झाला आहे. जम्मूला दरबार मूव्हची गरज आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर आणि जम्मू दरम्यान राजधानीच्या स्थानांतराशी संबंधित 152 वर्षे जुनी दरबार मूव्ह पद्धत एलजी मनोज सिन्हा यांनी जून 2021 मध्ये रद्द केली होती. दरबार मूव्हची परंपरा 1872 मध्ये जम्मू-काश्मीरच्या डोगरा घराण्यातील महाराजा रणबीर सिंग यांनी सुरू केली होती.

# रेप पीडितांना दरमहा 4000 देणार मध्य प्रदेश सरकार

### अल्पवयीन पीडिता गर्भवती झाली तरच मदत; बलात्कारातून जन्मलेल्या मुलांच्या संगोपनासाठीही योजना

वृत्तसंस्था
भोपाळ

मध्य प्रदेश सरकार गर्भवती अल्पवयीन बलात्कार पीडित महिला आणि बलात्कारातून जन्मलेल्या त्यांच्या मुलांची काळजी घेणार आहे. लवकरच सरकार एक नवीन योजना सुरू करणार आहे. ही योजना केंद्र सरकारच्या निर्देशानुसार आहे. याबाबतचा प्रस्तावही मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे.

ही योजना निर्भया फंडातून चालवली जाईल. मिशन वात्सल्य योजनेंतर्गत, पीडितेचे वय 23 वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत (जे आधी असेल) तिच्या पालनपोषणासाठी दरमहा रुपये 4000 दिले जातील.

राज्यातील वाढत्या बलात्कार आणि सामूहिक बलात्कार, विशेषत: मुलींच्या लैंगिक शोषणाच्या घटनांवरून काँग्रेस सरकारवर सातत्याने हल्लाबोल करत असताना मोहन सरकारने हा निर्णय घेतला आहे.

लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत, ही सुविधा POCSO (लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण) कलम 6 अंतर्गत प्रदान केली जाईल. केंद्र सरकारच्या या योजनेत गंभीर लैंगिक अत्याचार किंवा बलात्कारामुळे अल्पवयीन पीडिता गर्भवती झाली तरच तिला या योजनेसाठी पात्र मानले जाईल, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

बाल न्याय कायद्याच्या कलम 27 अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या बाल कल्याण समितीसमोर बलात्कार पीडितेच्या मुलांना सादर केले जाईल. हे काम कोणतेही पोलीस अधिकारी, विशेष बाल पोलीस युनिट, बाल कल्याण पोलीस अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण युनिटचे कोणतेही अधिकारी, कामगार कायद्यानुसार नियुक्त केलेले कोणतेही निरीक्षक करू शकतात.

# IIT विद्यार्थ्याचा हॉस्टेलमध्ये मृत्यू, आत्महत्येचा संशय

**नवी दिल्ली।** फेब्रुवारी महिन्यात एमटेकच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा हॉस्टेलच्या खोलीत संशयास्पद मृत्यू ओढवला होता. त्याच्या पालकांनी मुलाची हत्या झाल्याचा आरोप केला होता. आता दिल्लीच्या आयआयटी हॉस्टेलमध्ये पदव्युत्तर पदविकेच्या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा हॉस्टेलमधील त्याच्या खोलीत संशयास्पदरीत्या मृत्यू झाला आहे. यामुळे दिल्ली आयआयटीमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांना यात आत्महत्येचा संशय असून हत्येची शक्यता पोलिसांनी फेटाळून लावली आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी त्यांना पोलीस स्थानकात दिल्ली आयआयटी हॉस्टेलमध्ये एका विद्यार्थ्यानं आत्महत्या केल्याची माहिती देणारा फोन आला. हा विद्यार्थी झारखंडचा रहिवासी असून रात्री ११ च्या सुमारास पोलिसांना फोन आला होता. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. "खोली आतल्या बाजूने बंद होती.

# सासरच्या जाचाला कंटाळलेल्या जावयानं सुटकेसाठी थेट लॉरेन्स बिश्नोईचं घेतलं नाव

वृत्तसंस्था
गांधीनगर

मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोई चर्चेत आला आहे. सध्या गुजरातमधील तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या लॉरेन्स बिश्नोईची गँग बाहेर मात्र अनेक कारवाया करताना दिसत आहे. बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारीही बिश्नोई गँगनं घेतल्यानंतर अभिनेता सलमान खानला पुन्हा एकदा गँगकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे बिश्नोई गँगच्या कारवाया वाढत असताना दुसरीकडे गँगच्या नावाने वैयक्तिक स्वार्थ साधण्याचे प्रकारही समोर येऊ लागले आहेत. उत्तर प्रदेशच्या कानपूरमधून एक घटना नुकतीच उघड झाली आहे. सासरच्या जाचाला कंटाळून एका जावयानं थेट लॉरेन्स बिश्नोई गँगकडून आपल्याला जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याची तक्रार पोलिसांत केली. पोलिसांनी सविस्तर तपास केल्यानंतर त्यांना सत्य समजलं आणि पोलीसही चक्रावले!

कानपूरमधील देबियापूर निवासी वस्तीतून गेल्या शनिवारी एक तक्रार पोलीस स्थानकात दाखल झाली. तक्रार ऐकून पोलिसांनी लागलीच कारवाईला सुरुवात केली. त्याला कारणच तसं होतं. कारण राहुल कुमार नावाच्या या व्यक्तीने आपल्या तक्रारीत चक्क कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचं नाव घेतलं होतं. बाबा सिद्दिकींची हत्या करणारा आणि सलमान खानला जीवे मारण्याची धमकी देणारा लॉरेन्स बिश्नोई सध्या पोलीस कारवाईच्या केंद्रस्थानी असताना दुसरीकडे त्याच्या नावाने तक्रार दाखल झाल्यामुळे पोलिसांनी लागलीच सूत्र हलवली.

# अमेरिका अध्यक्षपद निवडणुक: 1.5 कोटी लोकांचे ॲडव्हान्स मतदान

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत 1.50 कोटीहून अधिक लोकांनी मतदान केले आहे. अमेरिकेत निवडणुकीपूर्वी मतदानाला ॲडव्हान्स व्होटिंग किंवा प्री-पोल व्होटिंग म्हणतात. अमेरिकेत 6 नोव्हेंबरला (भारतीय वेळेनुसार) मतदान होणार आहे. याआधी अमेरिकेतील अनेक भागांत लवकर मतदान सुरू आहे. न्यूयॉर्क टाइम्सनुसार, मंगळवारपर्यंत 1.5 कोटींहून अधिक अमेरिकन लोकांनी मतदान केले आहे. हे मतदान 47 हून अधिक राज्यांमध्ये मेलद्वारे (पोस्ट) करण्यात आले आहे.

निवडणुकीपूर्वी मतदान करण्याच्या या प्रक्रियेला ॲडव्हान्स मतदान किंवा मतदानपूर्व मतदान असे म्हणतात. यापूर्वीही अमेरिकन निवडणुकांमध्ये आगाऊ मतदान झाले आहे. याआधीच्या निवडणुकांमध्ये डेमोक्रॅट पक्षांनी मतदानपूर्व मतदानात वर्चस्व गाजवले असले तरी यावेळी काही प्रमुख राज्यांमध्ये रिपब्लिकन पक्षाने आघाडी घेण्यास सुरुवात केली आहे.



### निवडणुकीपूर्वी मतदानासाठी दररोज एका व्यक्तीला 8 कोटी देईन - मस्क यांची ऑफर

उपाध्यक्ष कमला हॅरिस आणि माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, जे राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत आहेत, तेदेखील लवकर मतदानाच्या ट्रेंडच्या आधारे डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन समर्थकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत जेणेकरून त्यांना मतदानासाठी पाठवता येईल.

अमेरिकेच्या निवडणुकीत ट्रम्प यांना उघडपणे पाठिंबा देणाऱ्या एलन मस्क यांनी म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या तारखेपर्यंत प्रत्येक दिवशी मतदान करून आलेल्या एका मतदाराला ते 1 मिलियन डॉलर किंवा सुमारे 8.40 कोटी रुपये देतील. विशेष म्हणजे ही योजना फक्त 7 स्विंग स्टेट्ससाठी लागू आहे. डोनाल्ड ट्रम्प 5 ऑक्टोबर रोजी बटलर, पेनसिल्व्हेनिया येथे रॅलीमध्ये पोहोचले. येथेच त्यांच्यावर हल्ला झाला होता. या रॅलीत जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलन मस्कदेखील सहभागी झाले होते. या निवडणुकीत ते उघडपणे ट्रम्प यांना पाठिंबा देत आहेत. कोरोनामुळे 2020च्या निवडणुकीपूर्वी अधिक लोकांनी मतदान केले अमेरिकेत आगाऊ मतदान वेगवेगळ्या प्रकारे केले जाते. बहुतांश राज्यांमध्ये मेल-इन मतदानाची सुविधा आहे. यामध्ये लोक पोस्टाद्वारे मतदान करतात. अनेक राज्यांमध्ये, मतदार मतदान केंद्रावर जाऊन निवडणुकीपूर्वीच वैयक्तिक मतदान करू शकतात. वेगवेगळ्या राज्यांमध्ये मतदानाची तारीख बदलू शकते. व्हर्जिनियामध्ये 20 सप्टेंबरपासून निवडणुका सुरू होत आहेत. विस्कॉन्सिनमध्ये अजून निवडणुका सुरू झालेल्या नाहीत.

2020 मध्ये, कोरोनाच्या भीतीमुळे, 6.5 कोटी लोकांनी पोस्टाद्वारे मतदान केले आणि 3.58 कोटी लोकांनी गर्दी टाळण्यासाठी लवकर मतदान केले. हा आकडा अंदाजे 64.4% आहे. त्याचप्रमाणे 2022च्या मध्यावधी निवडणुकीत, निवडणुकीपूर्वी सुमारे 50% लोकांनी मतदान केले होते.

# अमेरिकेत 'मॅकडी'मधून बॅक्टेरियाचा संसर्ग, एकाचा मृत्यू

### हॅम्बर्गर खाल्ल्याने 49 जण आजारी; 10 राज्ये बाधित



वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेतील मॅकडोनाल्डच्या बर्गरमधून बॅक्टेरियाचा संसर्ग (ई. कोली विषाणू) पसरला आहे. मॅकडोनाल्ड क्वार्टर पाउंडर हॅम्बर्गर खाल्ल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला. त्याच वेळी, 49 लोक आजारी आहेत, त्यापैकी 10 रुग्णालयात दाखल आहेत.

यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन (CDC) नुसार, सप्टेंबरच्या उत्तरार्धात सुरू झालेला हा ई. कोली विषाणू आत्तापर्यंत 10 पश्चिम राज्यांमध्ये पसरला आहे, बहुतेक प्रकरणे कोलोरॅडो आणि नेब्रास्कामध्ये नोंदवली गेली आहेत. बर्गर खाल्ल्यानंतर एक माणूस आजारी पडल्यानंतर मॅकडोनाल्डने आपल्या क्वार्टर पाउंडर हॅम्बर्गरमधून चिरलेला कांदा आणि बीफ काढून टाकले आहे. सध्या तपास सुरू आहे.

मॅकडोनाल्ड यूएसएचे अध्यक्ष जो एर्लिंगर यांनी एका व्हिडिओ संदेशात म्हटले आहे की, "आमच्यासाठी अन्न सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या भागात बर्गरबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तेथील रेस्तरॉंमधून क्वार्टर पाउंडर तात्पुरते काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ते म्हणाले की, बहुतांश राज्यांना याचा फटका बसलेला नाही. ज्या रेस्तरॉंमध्ये तक्रारी आल्या, त्यामध्ये एकाच कंपनीकडून कांद्याचा पुरवठा होत असल्याचे कंपनीने मान्य केले.

E. coli हा एक प्रकारचा बॅक्टेरिया आहे जो तुमची पचनसंस्था निरोगी ठेवण्यासही मदत करतो. परंतु तुम्ही दूषित अन्न खाल्ल्यास किंवा प्रदूषित पाणी प्यायल्यास काही स्ट्रेनमुळे अतिसार होऊ शकतो.